७० वर्ष

दैनिक

# संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०५९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## राहुल गांधींची भिवंडी कोर्टात हजेरी

मुंबई (दै. संध्या) : काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज भिवंडी न्यायालयात हजर झाले. राहुल यांनी 2014 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविरोधात एक वादग्रस्त विधान केले होते. त्यानंतर त्यांच्याविरोधात मानहाणीचा दावा दाखल करण्यात आला होता. याच प्रकरणात आज ते भिवंडी कोर्टात हजर झाले. राहुल गांधी शनिवारी सकाळी मुंबईत पोहोचले आणि तेथून ते थेट भिवंडी कोर्टाच्या दिशेने निघाले. त्यानंतर तिथे हजर राहून त्यांनी न्यायालयाची औपचारिक प्रक्रिया पार पाडली.



■ RSS विरोधात वादग्रस्त विधान केल्याचा आरोप; ठाण्यात भाजप कार्यकर्त्यांनी दाखवले काळे झेंडे

### ढिंग-टांग




# मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर सरपंच प्रशासक

**सरपंचांना लॉटरी: सरकारचा महत्वाचा निर्णय**

मुंबई (दै. संध्या)

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत संपत आहे, अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून सरपंचांना नेमण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याआधी निवडणूकांचा निकाल लागेपर्यंत प्रशासक नेमण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रशासक म्हणून अधिकाऱ्यांची नेमणूक करणे अडचणीचे ठरणार असल्याने या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान 'सरपंचाला' नेमण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांनंतर आता प्रतीक्षा आहे ती ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची. राज्यातील सुमारे १४ हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुका येत्या काळात होणार असून यातील काही ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ तर काहींची मुदत फेब्रुवारीमध्ये संपत आहे. जानेवारी २०२५ पासून फेब्रुवारी २०२६ या दरम्यान मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींची संख्या जवळपास १६०० ते १७०० च्या आसपास आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतील ५० टक्क्याहून अधिक आरक्षणाचा मुद्दा सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुका लांबणीवर टाकाव्या लागणार आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून सरपंचांना नेमण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारने जानेवारी महिन्यात यासंदर्भात परिपत्रक काढून ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा निर्णय जाहीर केला होता. मात्र ग्रामपंचायतींची मोठी संख्या आणि विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित उपलब्धता यामुळे प्रशासनासमोर अडचण निर्माण होऊ शकते हे लक्षात आल्यानंतर सरकारने सुधारित निर्णय घेतला आहे.



या निर्णयानुसार ग्रामपंचायतींची मुदत संपण्याच्या दिवसापर्यंत जे सरपंच पदावर असतील त्यांना प्रशासक म्हणून नेमण्यात येणार आहे. यामुळे स्थानिक पातळीवर निर्णय प्रक्रिया सुरळीत राहण्यात मदत होईल आणि नवीन व्यक्तींना प्रशासन समजून घेण्यासाठी लागणारा वेळ वाचणार आहे.

सरपंचांना प्रशासक नेमल्यानंतर सरपंचांकडून प्रशासकीय समिती नेमण्यात येईल. या प्रशासकीय समितीमध्ये उपसरपंच तसेच ग्रामपंचायतीतील विद्यमान सदस्यांचा समावेश असणार आहे. हा निर्णय २८ फेब्रुवारीपर्यंत किंवा त्याआधी मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठीच लागू असणार आहे. या कालावधीत प्रशासक आणि प्रशासकीय समिती नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे राहणार आहे.

मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसह नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य सरकारने प्रभाग रचनेचा अधिकृत कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेच्या कामाला सुरुवात झाली आहे. याविषयीचे आदेश ग्रामविकास विभागाच्या सहसचिव वर्षा भरोसे यांनी काढले आहे. या प्रक्रियेची जबाबदारी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्यावर सोपवण्यात आली आहे. असा असेल प्रभाग रचनेचा 'थ्री-स्टेप' प्लॅन प्रभाग रचनेचे काम प्रामुख्याने तीन टप्प्यांत पार पडणार आहे. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रत्यक्ष पाहणीवर भर देण्यात आला आहे. तीन टप्प्यात हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून ४ मे रोजी अधिकृतरीत्या अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाणार आहे. यानंतर राज्यात मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीसाठी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.

### ब्रेकिंग न्यूज

## होर्डिंग काढताना मनपा कर्मचाऱ्याचा मृत्यू

छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या) : छत्रपती संभाजीनगर शहरातील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महानगरपालिकेच्या एका २७ वर्षीय कर्मचाऱ्यावर आज काळाने घाला घातला. मुकुंदवाडी परिसरात कारवाई दरम्यान लोखंडी होर्डिंगचा स्पर्श ३३ केव्ही उच्च दाबाच्या वीज वाहिनीला झाल्याने एका तरुण कर्मचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य एक जण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे महापालिका प्रशासनाचा हलगर्जीपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून जाधव कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

## नागपुरात बारावीचा पेपर फुटला

नागपूर (दै. संध्या) : राज्याची उपराजधानी नागपूरमध्ये बारावीच्या बोर्ड परीक्षेला पेपरफुटीचे ग्रहण लागले असून, यामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. शहरातील सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर विज्ञान शाखेचे 'केमिस्ट्री' आणि 'फिजिक्स'चे पेपर परीक्षेपूर्वीच व्हॉट्सअॅपवर व्हायरल झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संपूर्ण परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची तातडीने बदली करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा सर्व प्रकार दुपारी १२ वाजेच्या सुमारास उघड झाला. परीक्षेदरम्यान एक विद्यार्थिनी स्वच्छतागृहात गेली होती. मात्र, १५ मिनिटे उलटूनही ती बाहेर न आल्याने पर्यवेक्षकांना संशय आला. तिची झडती घेतली असता तिच्याकडे मोबाईल सापडला. मोबाईलमधील व्हॉट्सअॅप तपासले असता, 'XII' नावाच्या ग्रुपवर परीक्षेपूर्वीच सकाळी 10 वाजून 37 मिनिटांनी केमिस्ट्रीचा पेपर अपलोड करण्यात आला होता. या विद्यार्थिनीने दिलेल्या माहितीवरून दुसऱ्या एका विद्यार्थिनीच्या बॅगेतूनही मोबाईल जप्त करण्यात आला. या दोन्ही विद्यार्थिनी एकाच ग्रुपच्या सदस्या आहेत.

## शिर्डीच्या साई मंदिरात दर अर्ध्या तासाने वेषांतर करुन चोरी

अहिल्यानगर (दै. संध्या)

■ आंध्रमधील टोळी गजाआड, दोन महिलांचा समावेश

साईबाबा मंदिर परिसरात दर अर्ध्या तासाने कपडे बदलून भाविकांच्या गर्दीत मिसळत चोरी करणाऱ्या आंध्र प्रदेशातील टोळीचा शिर्डी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत दोन महिला, एक पुरुष आणि एका अल्पवयीन बालकाला ताब्यात घेण्यात आले असून आरोपींकडून महागड्या कंपनीचे मोबाइल फोन आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. साई मंदिर परिसरात एका भाविकाची पर्स ब्लेडने कापून चोरी झाल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान काही महिला आणि पुरुष संशयास्पदरीत्या फिरताना दिसून आल्याने पोलिसांनी सापळा रचला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये संशयित व्यक्ती वारंवार कपडे बदलून मंदिर परिसरात फिरताना आढळल्या. महिलांनी सुरुवातीला पंजाबी ड्रेस परिधान केला होता, त्यानंतर साडी नेसून पुन्हा गर्दीत वावरल्याचे दिसून आले. या वेशांतरामुळे पोलीस आणि मंदिर सुरक्षारक्षकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात होता. संदिग्ध हालचालींच्या आधारे संशयितांना ताब्यात घेण्यात आले. मात्र, कारवाईदरम्यान एक पुरुष आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला. उर्वरित एक पुरुष, दोन महिला आणि एक अल्पवयीन बालक यांना पोलिसांनी पकडले.

## माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळा मुंबई येथे संपन्न

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळा महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या प्रमुख उपस्थितीत एनएससीआय डोम वरळी मुंबई येथे संपन्न झाला.

या प्रसंगी राज्यपालांच्या हस्ते पर्यावरण क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रतिनिधिक स्वरूपात सन्मानित करण्यात आले.

माझी वसुंधरा अभियान हे पर्यावरण रक्षणाचे दैवी कार्य असून यात सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी गांभीर्यपूर्वक प्रयत्न केल्यास विकसित भारताचे लक्ष गाठता येईल तसेच भावी पिढ्यांकरिता सुरक्षित वसुंधरा निर्माण करता येईल असे राज्यपालांनी सांगितले.



राज्यपालांच्या हस्ते माझी वसुंधरा अभियानातील यशोगाथांवर आधारित "कॉफी टेबल बुक" आणि "द क्लायमेट चेंज लेक्सिकॉन" या मराठी-इंग्रजी पर्यावरण शब्दकोशाचे देखील प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम देवेंद्र सिंह तसेच वरिष्ठ अधिकारी व निमंत्रित मान्यवर उपस्थित होते.

## "अपघातामागे बड्या नेत्याचा हात, 'या' मंत्र्याचा राजीनामा घ्या"

### रोहित पवारांची दिल्लीतून थेट मोदींकडे मागणी; राहुल गांधींनाही घातलं साकडं!



मुंबई (दै. संध्या)

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं अपघाती निधन झालं. त्यांच्या विमानात अपघताबाबत अनेक संशय निर्माण झाले आहेत. अजित पवारांचे पुतणे आणि आमदार रोहित पवारांनी हा प्रश्न सातत्याने उचलून धरलाय. या अपघाताबाबत अनेक प्रश्न निर्माण करून त्यांनी काही पुरावे सादर करण्याचा प्रयत्न केलाय. मुंबईत पत्रकार परिषद घेतल्यानंतर आज रोहित पवारांनी दिल्लीतील शरद पवारांच्या निवासस्थानी पत्रकार परिषद देऊन या प्रकरणी त्यांनी थेट आता पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडे सखोल चौकशीची मागणी केली आहे. यावेळी त्यांनी नागरी उड्डाण मंत्र्यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली.

मुंबईतील पत्रकार परिषदेत रोहित पवारांनी ब्लॅक बॉक्स आणि इतर तांत्रिक त्रुटी माध्यमांसमोर मांडल्या. यावेळी त्यांनी डीजीसीएतील अनेक अधिकाऱ्यांच्या तपासावरही आक्षेप घेतला. तसंच, व्हिसीआर कंपनीवर बंदी घालण्याची मागणी केली. यावेळी त्यांनी केंद्रातील मोठ्या नेत्याचा व्हिसीआर कंपनीच्या मालकाला साथ असल्याचा आरोप केला होता.

**देशातील प्रभावशाली नेत्यांनी यात लक्ष घालावं**

"नागरी उड्डाण मंत्री यांचा राजीनामा घेण्याची मागणी मी या पत्रकार परिषदेतून करणार आहे. या प्रकरणात मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना विनंती करणार आहे", असं रोहित पवार सुरुवातीलाच म्हणाले. तसंच, या प्रकरणामागे अत्यंत प्रभावशाली लोकांचा सहभाग असल्याचंही रोहित पवार म्हणाले.

## फरार कृष्णा आंधळे तीनदा गावी येऊन गेला, धनंजय देशमुख यांचा खळबळजनक दावा

बीड(दै. संध्या)



संतोष देशमुख हत्याकांडातील फरार आरोपी कृष्णा आंधळे हा आतापर्यंत 3 वेळा मस्साजोगला येऊन गेल्याची धक्कादायक बाब आज समोर आली. त्यामुळे पीडित देशमुख कुटुंबीयांनी त्याच्यापासून आपल्या जिवाला धोका असल्याचा दावा करत सुरक्षेची मागणी केली आहे. संतोष देशमुख हत्याकांडाची आज बीडच्या सत्र न्यायालयात सुनावणी झाली. त्यात न्यायालायने सरकारी पक्षाला बचाव पक्षाला योग्य ते सर्व दस्तऐवजांची पूर्तता करण्याचे कडक निर्देश दिले. आजच्या सुनावणीत आरोपींचे वकील, पुराव्यांची कमतरता व सरकारी वकिलांच्या नियुक्तीवर जोरदार खडाजंगी झाली. आरोपी क्रमांक 3 ते 7 यांनी विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांना या प्रकरणातून वगळण्याची मागणी केली. त्यांनी तसा अर्ज कोर्टात सादर केला. कोर्टाने सरकारी पक्षाला या अर्जावर आपले लेखी म्हणणे मांडण्याचे निर्देश दिले. आरोपी जयराम चाटे याने आपला वकील बदलला आहे. आता त्याच्यातर्फे वकील एम के वाघीरकर हे युक्तिवाद करणार आहेत. आरोपी प्रतीक घुले यानेही वकील लावण्यासाठी कोर्टाकडे 10 ते 15 दिवसांचा वेळ मागितला आहे.

# टीम इंडियाने ऑस्ट्रेलियात मालिका जिंकली! तिसऱ्या लढतीत स्मृती-जेमिमा चमकल्या

## स्मृती मानधना आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांच्या अर्धशतकी खेळी भारताच्या विजयात मोलाच्या ठरल्या

मुंबई (दै. संध्या)



स्मृती मानधना आणि जेमिमा रॉड्रिग्ज या जोडगोळीच्या अर्धशतकी खेळींच्या बळावर भारतीय संघाने ऑस्ट्रेलियावर तिसऱ्या टी२० सामन्यात १७ धावांनी विजय मिळवला. या विजयासह भारतीय संघाने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली.

पहिल्या लढतीत भारतीय संघाने डकवर्थ लुईस पद्धतीने ऑस्ट्रेलियावर २१ धावांनी विजय मिळवला होता. दुसऱ्या लढतीत ऑस्ट्रेलियाच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाजांनी हाराकिली केली. २ षटकात ५ विकेट्स गमावल्यामुळे भारतीय संघाला पराभवाला सामोरं जावं लागलं. तिसऱ्या लढतीत मात्र भारतीय संघाने सर्वसमावेशक खेळ करत बाजी मारली. ऑस्ट्रेलियाच्या संघाला काही महिन्यांपूर्वी झालेल्या वर्ल्डकप स्पर्धेत सेमी फायनलमध्ये भारताविरुद्ध पराभवाला सामोरं जावं लागलं होतं. आयसीसी स्पर्धेच्या जेतेपदांवर मक्तेदारी असणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या संघासाठी हा पराभव अनपेक्षित होता. या पराभवातून ऑस्ट्रेलियाचा संघ सावरला नसल्याचं चित्र या मालिकेतून दिसलं. या मालिकेपूर्वी क्रिकेट ऑस्ट्रेलियाने महिला संघाचं नेतृत्व सोफी मोलिनक्सकडे सोपवण्याचा निर्णय घेतला. कर्णधारपदासाठी अॅशले गार्डनरचं नाव चर्चेत होतं मात्र सोफीच्या नावाला पसंती मिळाली. मायदेशात झालेल्या पहिल्याच मालिकेत सोफीच्या नेतृत्वात ऑस्ट्रेलियाला पराभवाला सामोरं जावं लागलं. यानंतर तीन सामन्यांची वनडे मालिका आणि नंतर एकमेव टेस्ट होणार आहे.

२०१७ नंतर पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाला मायदेशात अशा स्वरुपाच्या मालिका पराभवाला सामोरं जावं लागलं आहे.

अॅडलेड ओव्हल इथे झालेल्या लढतीत भारतीय संघाने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. शफाली वर्मा ७ धावा करून तंबूत परतली. यानंतर स्मृती आणि जेमिमा यांनी दुसऱ्या विकेटसाठी १२१ धावांची भागीदारी रचली. शतकाकडे कूच करणाऱ्या स्मृतीला अनाबेल सदरलँडने बाद केलं. स्मृतीने ८ चौकार आणि ३ षटकारांसह ५५ चेंडूत ८२ धावांची खेळी केली.

७ चेंडूत २ चौकार आणि एका षटकारासह १८ धावांची खेळी करत ऋचा घोष तंबूत परतली. अनाबेलनेच जेमिमालाही बाद केलं. तिने ४ चौकारांसह ४६ चेंडूत ५९ धावांची खेळी केली. भारतीय संघाने १७६ धावांची मजल मारली. ऑस्ट्रेलियातर्फे अनाबेलने २ तर किम गॅरथ, सोफी मोलिनक्स यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. उत्तम फॉर्मात असणारी जॉर्जिआ वॉल १० धावांवर बाद झाली. बेथ मूनीला रेणुकाने तंबूत परतावलं. फोबी लिचफिल्डने प्रतिकार करत २६ धावांची खेळी केली. अनुभवी एलिसा पेरी फक्त १ धावा करू शकली. जॉर्जिआ वारेहम, अनाबेल सदरलँड याही मोठी खेळी करू शकल्या नाहीत. अष्टपैलू अॅशले गार्डनरने मात्र सहकारी बाद होत असतानाही ४५ चेंडूत ५ चौकार आणि एका षटकारासह ५७ धावांची खेळी केली. गार्डनरला अरुंधती रेड्डीने बाद केलं. गार्डनर बाद होताच ऑस्ट्रेलियाच्या विजयाच्या आशा मावळल्या.

# संपादकीय

## संशयाचं धुकं

विमानाचा ब्लॅक बॉक्स आगीत जळाल्याची माहिती आल्याने या प्रकरणाच्या चर्चेत आणखी वाढ झाली. तथ्य किती किंवा शक्यता किती याचा विचार न करता अशा चर्चांत मग प्रश्नांची भर पडत जाते. सध्या नेमकं हेच सुरू आहे. ते सहजपणे दुर्लक्ष करण्यासारखं नाही. अजितदादांच्या अपघाती निधनाने सामान्य माणूस अजूनही बुचकळ्यात आहे. एखाद्या अनपेक्षित घटनेचा धक्का एवढा मोठा असतो, की घटना घडून गेल्यानंतरही बरेच दिवस ती घटना मनाला स्वीकारता येत नाही. सत्य कळत असतं, पण त्यावर विश्वास ठेवायला मन तयार नसतं. एका बाजूला अनपेक्षित, अविश्वसनीय घटना आणि त्यानंतर समाज माध्यमांवरून फिरत असलेल्या अजितदादांच्या अनेक चित्रफिती. त्यात भर आमदार रोहित पवार यांच्याकडून व्यक्त होत असलेल्या संशयाची. अपघात हे खरं तर अतार्किकच असतात. त्यामुळे, तर्काने त्यात अनेक प्रश्न उपस्थित होतच असतात. काही सर्वसामान्यांच्या मनात असलेले प्रश्न, काही तज्ज्ञांचे प्रश्न, आपल्याकडे प्रत्येक व्यवस्थेत असलेल्या अव्यवस्था आणि नेमक्या त्याच दिवशी घडलेल्या काही अपवादात्मक त्रुटी या सगळ्यांची गोळाबेरीज रोहित यांच्या प्रश्न आणि संशयात असल्याने त्या अपघाताभोवतीचं गूढ वाढत चाललं आहे. रोहित यांच्या आरोपवजा प्रश्नांना सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि प्रवक्ते आनंद परांजपे यांनी उत्तरं दिली. पण, तरीही रोहित यांच्या पत्रकार परिषदा थांबेनात आणि त्यांच्या समर्थनार्थ अजितदादांचे धाकटे चिरंजीव जय पवारही आले, तेव्हां राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उत्तरं द्यायला सुरुवात केली. रोहित यांच्या नेमक्या प्रश्नांना खरे तर हवाई वाहतूक विभागाशी संबंधित यंत्रणांनी उत्तर द्यायला हवं होतं किंवा निदान तज्ज्ञांचे अहवाल येईपर्यंत वाट बघण्याचं आवाहन तरी करायला हवं होतं. पण, विमान ज्या खासगी कंपनीचं होतं, त्या कंपनीने आपल्या बाजूने अजून तरी कोणतीच वस्तुस्थिती उघड न केल्याने आणि हवाई प्रवासी वाहतूक विभागाशी संबंधित नियंत्रक संस्थांनीही अजून तपासातील प्रगती अधिकृतरीत्या जनतेसमोर न ठेवल्याने रोहित यांच्या प्रश्नांची धार वाढत चालली आहे. सर्वसामान्य माणसालाही त्यामुळे काही प्रश्न पडू लागले आहेत. अजितदादांच्या अपघाती निधनानंतर त्याविषयी पहिली शंका व्यक्त केली, ती पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी. ममता यांचा संशय पसरू नये आणि या दुःखद घटनेला वेगळं वळण लागू नये, तो राजकारणाचा विषय होऊ नये, यासाठी शरद पवार यांनी तातडीने माध्यमांसमोर येऊन खुलासा केला. पण, त्यानंतर ही जबाबदारी खुद्द त्यांचे नातू रोहित यांनीच घेतली! राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते, आमदार अमोल मिटकरी ही या अपघाताबाबत प्रश्न उपस्थित करणारी दुसरी राजकीय व्यक्ती होती. ममतादीदींनी विषय नंतर सोडून दिला. मिटकरीही फार बोलले नाहीत. पण, रोहित या संदर्भातील तांत्रिक व परिस्थितीजन्य माहिती गोळा करू लागले. खासगी गुप्तहेरांमार्फतही काही माहिती गोळा करणार असल्याचं त्यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केलं. मुंबई आणि दिल्लीत त्यांनी माध्यमांसमोर सादरीकरणही केलं आणि त्याला धरून रोज काही ना काही मुद्दे मांडत राहिले. त्यामुळे संशयाचं वादळ मनामनांत घोंघावतं आहे. घराघरांत त्याची चर्चा सुरू आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स आगीत जळाल्याचं सांगितलं गेल्याने अविश्वासात भर पडली आहे. तथ्य किती किंवा तथ्याच्या शक्यता किती, याचा विचार न करता अशा चर्चांत मग प्रत्येकाच्या डोक्यातील प्रश्नांची भर पडत जाते. सध्या नेमकं हेच सुरू आहे. ते सहजपणे दुर्लक्ष करण्यासारखं नाही. रोहित पवार आणि अजितदादांचं कुटुंब तांत्रिकदृष्ट्या वेगवेगळ्या पक्षात आहेत. रोहित आणि अजितदादांच्या पक्षातील 'अन्य' नेत्यांचा राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावरही दादांच्या मृत्यूनंतर वाद झाला होता. त्यामुळे, रोहित यांच्या या आरोपांनाही त्या नेत्यांकडून त्याच पद्धतीने उत्तरं दिली जातील, असं वाटत असतानाच एके दिवशी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या पार्थ पवार आणि पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटल्या. त्यांनी या अपघाताची सीबीआय या केंद्रीय यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी केली.

## संस्कृत सुभाषित

अतिक्रान्तं हि यत्कार्य पश्चाचिंतयते नर:
तच्चास्य न भवेत्कार्य चिंतया च विनश्यति ।
(कर्णपर्व, अध्याय ३१, २९ महाभारत)
अर्थ ;घटना घडून गेल्यानंतर मागाहून जो चिंता करीत बसतो, त्याचे कार्य तर होत नाहीच, पण चिंतेने नाश मात्र होतो.

## गुरु वचन

### प्रेम स्वातंत्र्याची किंमत नव्हे! : ओशो

आम्हाला सर्व हवे आहे पण आम्हाला प्रेम स्वातंत्र्याच्या किमतीवर नकोय. आपल्याला दोन्ही कसे मिळू शकते? मला माझे स्वातंत्र्य हवे आहे. मी माझ्या प्रेयसीला स्वातंत्र्य देतो पण मला तिचे लक्ष ठेवण्याच्या रुपात दु:ख मिळते. प्रेयसीला स्वातंत्र्य देण्याचा तुमचा विचारच चुकीचा आहे. प्रेयसीला स्वातंत्र्य देणारे तुम्ही कोण आहात? तुम्ही प्रेम करू शकतात व तुमच्या प्रेमात स्वातंत्र्य आहे. ही गोष्ट दुसऱ्याला देण्यासारखी नाही. जर देण्यास आली तर तिच अडचण येईल जिचा तुम्ही सामना करत आहात.

खरंतर तुम्ही स्वातंत्र्य देऊ इच्छित नाही. तुम्हाला वाटेल की, स्वातंत्र्य देण्यासारखी परिस्थितीच निर्माण होऊ नये पण तुम्ही अनेकदा मला प्रेम स्वातंत्र्य देते, हे सांगताना ऐकले असेल म्हणून स्वातंत्र्य देण्यासाठी स्वत:वर दबाव टाकतात कारण तुमचे प्रेम, प्रेम नसते.

तुम्हाला एका अवघड प्रश्नात अडकले आहात. जर तुम्ही स्वातंत्र्य दिले नसते तर तुम्हाला प्रेमावर संशय आला असता. जर तुम्ही इच्छा नसूनही स्वातंत्र्य दिले तर हजार प्रश्न निर्माण होतात. तुम्ही तुमच्या प्रेयसीसाठी पुरेसे नाहीत? की तिला दुसऱ्याची साथ हवी म्हणून तिला स्वातंत्र्य हवे आहे? यामुळे दु:ख होते व तुम्ही विचार करतात की, तुम्ही आपल्यापेक्षा कमी महत्व देतात.

तिला स्वातंत्र्य देऊन तुम्ही इतरास पहिले ठेवले व नंतर स्वत:ला. हे अंहकाराविरुद्ध आहे व यामुळे काही फायदा होणार नाही कारण तुम्ही जे स्वातंत्र्य दिले आहे त्यासाठी तुम्ही बदलणार.

दुसरी गोष्ट म्हणजे जर तुमची प्रेयसी दुसऱ्यासोबत राहिली असेल तर तुम्हाला आपल्या प्रेयसीसोबत राहणे वेगळे वाटेल. यामुळे तुमच्या व तिच्यात अडथळा निर्माण होईल. तिने दुसऱ्याची निवड केली आहे व तुम्हाला सोडून दिले आहे किंवा तिने तुमचा अपमान केला आहे.

व तुम्ही तिला खुप काही दिले आहे, तुम्ही उदार होत आहोत, तुम्ही तिला स्वातंत्र्य दिले आहे. तुम्हाला दुखावल्यासारखे जाणवत आहे म्हणून तुम्ही तिला कुठल्यातरी रुपात दुखवाल.

पण हे सर्व गैरसमजामुळे होते. मी हे म्हणालो नाही की, तुम्ही प्रेम करत असाल तर तुम्हाला स्वातंत्र्य द्यावे लागेल. नाही मी म्हणालो आहे की, प्रेम स्वातंत्र्य आहे. येथे प्रश्न देण्याचा नाही. जे जसे आहे त्याला तसेच राहू द्या. विनाकारण गुंतागूंत का वाढवायची? अगोदरच अनेक अडचणी आहेत.

जर तुमचे प्रेम त्या पातळीपर्यंत आले आहे की, स्वातंत्र्य तिचे अंग बनले आहे तेव्हा तुमच्या प्रेयसीला परवानगी घेण्याची गरजच राहणार नाही. जर मी तुमच्या जागी असतो व माझ्या प्रेयसीने परवागनी मागितली तर मला दु:ख झाले असते. याचा अर्थ तिला म इझ्या प्रेमावर विश्वास नाही. माझे प्रेम स्वातंत्र्य आहे. मी तिच्यावर प्रेम केले आहे याचा अर्थ असा नव्हे की, मी सर्व मुभा दिली ज्यामुळे ती कुणासोबतही हसू शकेल, कुणासोबतही नृत्य करु शकेल, कुणावर प्रेम करु शकणार नाही कारण आपण कोण आहोत?

आपण कोण आहोत? हा मुळ प्रश्न आहे, जो सर्वांनी केला पाहिजे. आपण सर्व अनोळखी आहोत व या आधारावर आपण सांगू शकतो की, मी तुला स्वातंत्र्य देईल किंवा मी तुला स्वातंत्र्य देणार नाही. जर तु माझ्यावर प्रेम करत असेल तर दुसऱ्यावर प्रेम करू शकत नाही? या सर्व मूर्ख गोष्टी आहे पण या सर्व मानवावर सुरुवातीपासून हावी राहिल्या आहेत व आपण अजूनही असभ्य आहोत. प्रेम काय असते? हे आपणास अजूनही माहित नाही.

जर मी कुणावर प्रेम करत असेल तर मी त्या व्यक्तीप्रती कृतज्ञ असतो की तिने मला प्रेम करू दिले, तिने माझे प्रेम स्वीकारले.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:अश्विनी |
| २२ फेब्रुवारी २०२५ | १७:५४:२१ |
| रविवार | योग:शुक्ल १३:०८:१० |
| | करण:बालव ११:१०:१२ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव २२:१०:५२ |
| फाल्गुन शके | सूर्य:कुम्भ |
| संवत्– १९४७ | चन्द्र:मेष |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – रमजान |
| मास– फाल्गुन | तारीख – ४ |
| ऋतु– सौर शिशिर | विशेष |
| शुक्ल पक्ष | शुभ दिवस |
| तिथि:पंचमी ११:१०:१२ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८६७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | | | | 7 | 4 | 9 | |
| 2 | 3 | 1 | 4 | | 9 | | | |
| | 7 | 9 | | 6 | | 3 | | |
| 7 | 2 | | | | | 8 | | 6 |
| | | | | 2 | | | | |
| 9 | | 8 | | | | | 4 | 1 |
| | | 4 | | 8 | | 1 | 3 | |
| | | | 9 | | 5 | 6 | 2 | 4 |
| | 6 | 2 | 7 | | | | 8 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८६६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | 4 | 2 | 9 | 6 | 1 | 8 | 5 |
| 1 | 9 | 6 | 5 | 4 | 8 | 2 | 7 | 3 |
| 2 | 5 | 8 | 3 | 7 | 1 | 9 | 4 | 6 |
| 4 | 7 | 2 | 8 | 5 | 9 | 6 | 3 | 1 |
| 3 | 6 | 9 | 1 | 2 | 7 | 8 | 5 | 4 |
| 8 | 1 | 5 | 6 | 3 | 4 | 7 | 2 | 9 |
| 5 | 8 | 7 | 9 | 1 | 3 | 4 | 6 | 2 |
| 9 | 4 | 3 | 7 | 6 | 2 | 5 | 1 | 8 |
| 6 | 2 | 1 | 4 | 8 | 5 | 3 | 9 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२९० – इजिप्तचा फेरो राम्सेस दुसऱ्याचा राज्याभिषेक.
- १२८१ – मार्टिन चौथा पोप पदी.
- १२८८ – निकोलस चौथा पोप पदी.
- १४९५ – फ्रांसचा चार्ल्स आठव्याने नेपल्सचे राज्य बळकावले.
- १७४४ – तुलोनची लढाई सुरू.
- १८१९ – स्पेनने फ्लोरिडाचा प्रदेश अमेरिकेला ५०,००,००० अमेरिकन डॉलरच्या मोबदल्यात विकला.

### राष्ट्रीय

- २००८ – सॅमसंग टेलिकम्युनिकेशन्स इंडियाने कमी किमतीच्या मोबाईल बाजारात शिरकाव करण्यासाठी नवा मोबाईल सेट सॅमसंग गुरु–१०० सादर केला.

### जन्म

- १४०३ – चार्ल्स सातवा, फ्रांसचे राजा यांचा जन्म.
- १७३२ – जॉर्ज वॉशिंग्टन, अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
- १८५७ – रॉबर्ट बेडेन–पॉवेल, बॉय स्काउटसचे संस्थापक यांचा जन्म.
- १८५७ – हाइनरिक हटर्झ, जर्मन भौतिकशास्त्रज्ञ यांचा जन्म.
- १८८९ – ओलाव बेडेन–पॉवेल, गर्ल गाईडची संस्थापिकांचे जन्म.

### निधन

- १३७१ – डेव्हिड दुसरा, स्कॉटलंडचे राजा यांचे निधन.
- १९२१ – सलीम अल–मुबारक अल–सबाह, कुवैतचे अमीर यांचे निधन.
- २००८ – स्टीफन मार्लो, खाजगी गुप्तहेर चेस्टर ड्रमचे प्रसिद्ध चरित्रास केंद्रस्थानी ठेवून लिहिलेल्या पुस्तकांच्या मालिकेसाठी ओळखले जाणारे लेखक यांचे निधन.

## : SMS :

Har Mard ki life
dekho to..
without shadi
'SPIDERMAN'
Shadi k time
SUPERMAN
Shadi k baad
GENTLEMAN
Or Biwi khubsurat
Ho to Puri UMAR
WATCHMAN

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.४ | १९.७ |
| अहमदनगर | ३०.१ | १९.३ |
| अकोला | ३३.३ | २१ |
| अमरावती | ३२.१ | २० |
| बीड | ३४.२ | २२ |
| भंडारा | ३३.३ | १८.५ |
| बुलढाणा | २६.७ | ११.८ |
| चंद्रपूर | ३४.३ | २२.८ |
| चेन्नई | ३३.३ | २५.२ |
| नवी दिल्ली | २६.५ | १५ |
| धुळे | ३३.३ | २२.४ |
| गोंदिया | ३१.८ | २०.८ |
| जळगाव | ३३.४ | २१.७ |
| कोल्हापूर | ३२ | १९.१ |
| लातूर | ३१.४ | १९.२ |
| मुंबई | ३३.२ | २५.३ |
| नागपूर | ३१.९ | २०.१ |
| नांदेड | ३१.५ | २० |
| नंदूरबार | ३१ | २०.५ |
| नाशिक | ३१.५ | १९.६ |
| पुणे | ३०.४ | १८ |
| पंढरपूर | ३१.१ | १९.६ |
| सातारा | ३२.१ | १५ |
| सांगली | ३२.८ | १८.६ |
| सोलापूर | ३१.७ | २०.३ |
| वर्धा | ३३.४ | १८.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** महत्वाची कामे पार पडतील. व्यवसायात चांगले वातावरण राहील. तुम्ही आपल्या मताबद्दल अधिक आग्रही राहाल.

**तुळ :** वेगवेगळ्या सभा, संमेलने यांना उपस्थित रहाल. सांस्कृतिक कामात विशेष लक्ष द्याल.

**वृषभ :** तुमच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव वाढेल. अनेकांचे सहकार्य लाभेल. कौटुबिक जीवनात आनंदाचे वातावरण राहील. शत्रूपिडा नाही.

**वृश्चिक :** तुमच्या कार्यक्षेत्रात विशेष संधी लाभेल. तुमचे निर्णय योग्य ठरतील. नवीन कल्पना अंमलात आणू शकाल. मनोबल व आत्मविश्वास वाढेल.

**मिथुन :** अनेक कामे मार्गी लागतील. थोरामोठ्यांशी असलेल्या परिचयाचा फायदा होईल. मुलामुलींच्या संदर्भात एखादी चांगली घटना घडेल.

**धनु :** तुमच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव वाढेल. व्यवसायात आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. खर्चाचे प्रमाण वाढेल.

**कर्क :** सभा, संमेलने, सांस्कृतिक कार्यक्रम यामध्ये सहभागी व्हाल. तुमच्या विचारांना योग्य दिशा सापडेल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. प्रतिष्ठा लाभेल.

**मकर :** उत्साह व उमेद वाढेल. प्रवासाचे योग येतील. वरिष्ठांचे व वडिलधाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभेल. थोरामोठ्यांच्या मैत्रीचा फायदा होईल.

**सिंह :** उत्साह व उमेद वाढेल. विरोधक व शत्रू यांच्याबरोबर हातमिळवणी कराल किंवा मतभेद मिटवण्यात यश मिळवाल. शत्रूपिडा जाणवणार नाही.

**कुंभ :** प्रवासाचे योग येतील. उत्साह व उमेद वाढेल. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. व्यवसायात वाढ होईल.

**कन्या :** व्यवसायात समाधानकारक परिस्थिती राहील. मात्र व्यवसायात अडचणी जाणवणार आहेत. आर्थिक लाभाचे प्रमाण वाढेल. नवीन स्नेहसंबंध जुळतील.

**मीन :** व्यवसायाच्या वाढीसाठी विशेष प्रयत्न कराल. विरोधकांची व हितशत्रूंची फारशी काळजी करण्याचे कारण नाही. मार्गात कोणी आडवे येणार नाही.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६७



### आडवे शब्द

१. म.न.से.चे. निवडणूकचिन्ह
५. अवकाशवाहन
९. गोलवाटोळा
१०. माफी असावी!
११. नदीचा काठ
१३. दूर, पलीकडे
१४. फोटो
१६. योग्य, बरोबर
१७. चरफड, घालमेल
१९. स्वाद
२१. गवताचे रूंद पान
२२. वस्तू, माल
२४. सरसकट
२७. गौरवर्णी
२८. लबाडीचा हेतू
३०. पराक्रमी योद्धा
३२. पायापासून डोक्यापर्यंत
३५. निकट
३७. अंगावरील बारीक केस
३८. पुष्कळ
४०. राजाचे संबोधन
४२. तमाशातील नर्तक
४३. दिवाळीतील दारू
४४. होडी
४५. नवीन
४७. अखंड
४९. फोडणी दिलेले ताक
५३. वाळवी
५४. आईवडील
५५. अवहेलना
५६. दात
५७. चालू दिवस
५७अ. पुळका, कणव
५८. पारंब्याचे झाड
५९. गीत
६०. सोपे नसलेले
६१. चालू वर्षी
६२. कडा काढण्याचे दातेरी साधन
६३. मलई
६४. घागरा
६५. विश्वासार्ह
६७. टिंगल, चेष्टा
६८. तातातूट
७०. शपथ
७१. ब्रह्मदेव
७२. चित्रपट व क्रिकेटसमीक्षक (आडनाव)
७३. रावण
७४. ज्याला आजवर कोणी पराभूत करू शकले नाही असा, अजिंक्य

### उभे शब्द

१. सत्ताविसावे नक्षत्र
२. देवांचा राजा
३. शहर
४. एकंदर परिस्थिती
५. मन, आतील बाजू
६. माफी मागणारा
७. आकाशातील विशिष्ट सत्ताविस तारकासमूह
८. दरवेशाच्या तालावर नाचणारा प्राणी
१२. प्रजा
१३. अर्जुनाचा रथ ओढणाऱ्या श्रीकृष्णाचे नाव
१५. चटकन न तुटणारा
१७. मुलगा (संस्कृत)
१८. नाट लागणे याअर्थी शब्दप्रयोग– 'प्रथमग्रासे–––'
२०. छिद्र
२१. दिल्लीचा विमानतळ
२३. एक सुगंधी वनस्पती
२४. एकूण एक
२५. निर्लज्ज
२६. चेष्टा करणारा
२७. सत्कार, प्रशंसा
२९. भांडण
३१. चलनवलन
३२. दुर्लक्ष करणे
३३. भुंगा, भ्रमर
३४. न्यूनता
३६. भार
३८. सर्वांहून वेगळे, अद्भुत
३९. नुकसान
४१. पराभव
४२. नासलेला
४६. राहिलेला भाग
४८. पिच्छा पुरवणे, भीड घालणे
५०. सैन्याचा दाणागोटा
५१. मयूर
५२. आतल्या गाठीचा कपटी
५४. घरातील मधली खोली
५४अ. शेतातील उत्पादन
५५. प्रकटणे
५७. आयात
५९. गाणे म्हणणारा
६०. कमळ
६२. बारीक चणीचा तरी कष्टाळू
६३. तात्पर्य
६५. भस्मसात
६५अ. पेज
६६. रौप्य, चांदी
६८. पुष्कळ
६९. साधना
७०. अवधान, लक्ष

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ८६६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.दिवाळी दसरा हातपाय पसरा १०.पोक १२.नर १३.घर १४.रमावर १५.कसाबसा १७.चाकवत १९.संप २०.कलम २२.धाक २३.अचानक २४.रवा २५.गपगार २७.कर्म ३०.प्रयास ३१.रत ३२.चुकार ३४.कद ३७.नरकवणी ४०.याचना ४२.नक्षा ४३.लस ४५.कारका ४६.अभाव ४८.गृहरचना ५०.वसतिगृह ५२.वात ५४.पर ५६.हनन ५८.आमंत्रण ५९.नापाक ६२.मदत ६४.गायत्री ६५.कलाटणी ६६.कलम ६७.नवल ६८.करपात्रता ७०.हयगय ७२.कद्रू ७३.नव ७४.जनसत्ता ७६.सबका मालिक एक ७९.शहर ८०.पाहणे ८१.कटाक्ष

उभे उत्तर : १.दिनकर २.वारसा ३.दरसाल ४.राघव ५.हार ६.पाचक ७.परत ८.समा ९.रावणाचा लेक ११.कळप १६.बकवास १७.चाकरचुकर १८.वरकरणी १९.संकट २१.मगर २२.धागा २४.रया २६.पतन २९.रसना ३०.प्रधानमंत्री ३३.कावकाव ३५.दया ३६.कलह ३८.रकाना ३९.सभागृह ४१.चकवा ४४.सरपण ४६.अति ४७.वहन ४८.गृहमंत्री ४९.चर ५१.सल ५३.तरतमभाव ५५.कपाट ५७.नमक ५८.आयव्यय ५९.नाला ६०.कणीक तिंबणे ६१.हपापाचा माल ६३.दल ६५.कलकत्ता ६७.नयन ६९.तारक ७०.हताश ७१.गजर ७३.नकटा ७५.सर्दी ७६.सह ७७.माया ७८.एक

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### ‘द किरण माने शो – स्टोरी शिवराज्याभिषेकाची’ नाटकाला पुरस्कार



पुणे (दैनिक संध्या) : झी नाट्यगौरव पुरस्कार सोहळ्यात ‘द किरण माने शो – स्टोरी शिवराज्याभिषेकाची’ या ऐतिहासिक नाटकाला ‘विशेष लक्षवेधी कलाकृती’ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या अनटोल्ड इतिहासाला शिवजयंतीदिनी मिळालेला हा सन्मान संपूर्ण टीमसाठी अभिमानाचा क्षण ठरला. या यशाबद्दल निर्माते अभय जगताप यांनी आनंद व्यक्त करत, “शिवरायांच्या अनकथित इतिहासाला मिळालेला हा सन्मान आमच्यासाठी आभाळभर आनंद देणारा आहे,” असे सांगितले. नाटकाच्या यशात इतिहासकार इंद्रजीत सावंत, लेखक सतीश तांदळे, दिग्दर्शक विनायक कोळवणकर, क्रिएटिव्ह दिग्दर्शक किरणसिंह चव्हाण, मुव्हमेंट दिग्दर्शक केतन जाधव, संगीतकार हृषिकेश देशमाने व श्रीनाथ म्हात्रे, गीतकार दुर्गेश काळे, विनायक पवार, कल्याण उगले, प्रभाकर मठपती, प्रकाशयोजना निखिल मारणे, ध्वनिसंयोजन चंद्रसेन सवाशे, नेपथ्य रोहित-केतन तसेच कायदेविषयक सल्लागार जयेश वाणी यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. तसेच गायक-वादक टीम, पीआर टीम, रंगभूषा, वेशभूषा, कपडेपट, बॅकस्टेज आर्टिस्ट आणि नाटकाच्या निर्मितीत हातभार लावणाऱ्या सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा सन्मान मिळाल्याचे निर्मात्यांनी नमूद केले.

### मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड रविवारी पुणे जिल्हा दौऱ्यावर

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांचा रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे येथे दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यात मंत्री श्री. राठोड हे पुणे पत्रकार (भवन) प्रतिष्ठान, नवी पेठ येथे सकाळी १० वाजता आयोजित राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत. तसेच दिघी (पुणे) येथे सकाळी ११.३० वाजता गोर बंजारा तीर्थक्षेत्र मंदिरात श्री जगदंबा माता व संत श्री सेवालाल महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण कार्यक्रमासही ते उपस्थित राहणार आहेत, त्यानंतर मुबंईकडे रवाना होणार आहेत. या कार्यक्रमास स्थानिक पदाधिकारी, समाजबांधव व कार्यकर्ते, नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.



### हिंद-दी-चादर’कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिंधी समाजाचे सहकार्य-सुरेश हेमनानी

पुणे (दैनिक संध्या) : मागम शताब्दी वर्षानिमित्त २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी खारघर येथे आयोजित 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी सिंधी समाजाचा पाठींबा असून कार्यकम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन भारतीय सिंधू सभाचे महाराष्टाचे अध्यक्ष सुरेश हेमनानी यांनी केले. भारतीय सिंधी सभेच्यावतीने पुणे येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी 'हिंद-दी-चादर’कार्यक्रम राज्यस्तरीय समन्वय समितीचे अशासकीय सदस्य चरणजितसिंग साहनी, भारतीय सिंधी सभेच्या पुणे शाखा अध्यक्ष जितेंद्र अडवाणी, उपाध्यक्ष ज्ञान रोहेरा, सरचिटणीस जितेंद्र हिरानंदानी,महिला शाखा अध्यक्षा रेश्मा खियानी, महिला शाखा कार्याध्यक्ष निर्मला दादलानी, महिला शाखा उपाध्यक्षा रोमा खेमचंदानी आदी उपस्थित होते. सुरुवातीला श्री. साहनी यांनी हिंद-दी-चादर’ या कार्यक्रमाच्या अनुषंगाने बैठकीत माहिती दिली. श्री. हेमनानी म्हणाले, भारतीय सिंधी सभातर्फे १ मार्च रोजी खारघर कार्यक्रमस्थळी जाण्यासाठी बसेसची व्यवस्था, अल्पोपहार, भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. सामाजिक ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता आणि धर्मसंरक्षणाच्या विचारांचा प्रसार करणारा हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिंधी समाजातील नागरिकांनी सक्रीयपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री. हेमनानी यांनी केले.



### पूजा कटुर्देने बाइक सीनच्या शूटिंगदरम्यान समतोल कसा साधला

पुणे (दैनिक संध्या) : सोनी सबचा लोकप्रिय शो ‘पुष्पा इम्पॉसिबल’, जो आपल्या प्रेरणादायी कथेसाठी आणि प्रेक्षकांना जवळचा वाटणाऱ्या पात्रांसाठी ओळखला जातो, आता एक जबरदस्त सीक्वेन्स घेऊन येतो आहे. या सीनमध्ये पुष्पा (करुणा पांडे) आणि प्रार्थना (पूजा कटुर्दे) एकत्र बाइकवर दिसणार आहेत. हा सीन तणाव आणि भावनांनी भरलेला असून, त्यात तातडीची परिस्थिती आणि जबरदस्त इमोशन्स दाखवले आहेत. हा सीक्वेन्स कलाकारांसाठी भावनिक आणि शारीरिकदृष्ट्या खूपच आव्हानात्मक होता. सीनमध्ये पूजा कटुर्देला बाइक चालवायची होती आणि करुणा पांडे त्यांच्या मागे बसल्या होत्या. स्क्रीनवर हा क्षण जितका रोमांचक दिसतो, तितकाच कठीण होता त्याचे शूटिंग. यासाठी अनेकदा रिहर्सल्स करण्यात आल्या, दोघींमध्ये योग्य समन्वय साधावा लागला आणि एकमेकींवर पूर्ण विश्वास ठेवावा लागला. कारण सीनमध्ये भावनांचा भार खूप होता, त्यामुळे पूजा आणि करुणा दोघींनाही त्या क्षणात पूर्णपणे गुंतून राहावे लागले, तसेच बाइक चालवताना सुरक्षिततेची काळजी घ्यावी लागली. सेटवर वातावरण गंभीर होते कारण सगळ्यांना माहित होते की हा सीन योग्य प्रकारे करणे किती महत्त्वाचे आहे. आपल्या अनुभवाबद्दल बोलताना पूजा कटुर्दे म्हणाल्या, “करुणा मॅडम माझ्या मागे बसल्या होत्या आणि त्या क्षणी मला खूप जबाबदारी जाणवत होती. मला रस्ता, कॅमेरा आणि भावना या तिन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागले. आम्ही फाइनल टेकच्या आधी अनेकदा प्रॅक्टिस केली कारण सुरक्षितता खूप महत्त्वाची होती. शूटिंगदरम्यान मला खरंच सीनचा तणाव जाणवत होता आणि त्याने माझी परफॉर्मन्स आणखी चांगली झाली. करुणा मॅडम सतत मला सपोर्ट करत होत्या आणि शांत राहायला सांगत होत्या. सीन पूर्ण झाल्यावर आम्ही दोघी खूप भावुक झालो. हे आव्हानात्मक होतं, पण माझ्यासाठी एक अभिनेत्री म्हणून खूप खासही होतं.” पाहा ‘पुष्पा इम्पॉसिबल’, दर सोमवार ते शनिवार रात्री 9:30 वाजता, फक्त सोनी सबवर.

## “हिंद दी चादर” श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या ३५०व्या

# शहीदी वर्षानिमित्त विशेष टपाल प्रेझेंटेशन पॅकचे पुण्यात प्रकाशन

पुणे (दै. संध्या) :

गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या टपाल विभागामार्फत विशेष प्रेझेंटेशन पॅक जारी करण्यात आला असून त्याचे औपचारिक प्रकाशन शुक्रवारी पुणे महानगरपालिका येथे करण्यात आले.

या प्रेझेंटेशन पॅकचे अनावरण पुण्याच्या प्रथम नागरिक महापौर श्रीमती मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते तसेच उपमहापौर श्री. परशुराम वाडेकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी पुणे जिल्हा शीख गुरुद्वारा असोसिएशनचे अध्यक्ष सरदार संतसिंगजी मोखा, गुरुद्वारा गुरु नानक दरबारचे अध्यक्ष सरदार चरणजितसिंग साहनी, सिंह सभा देहूरोडचे अध्यक्ष सरदार गुरमीतसिंग रट्टू, गुरुद्वारा श्री गुरु सिंग सभाचे अध्यक्ष सरदार भोला सिंग अरोरा, रमिन्दर सिंघ राजपाल, डॉ. रणजीत सिंघ अरोरा, एन. पी. सिंग बक्षी, एस. एस. लबाना, बलजीत सिंग, शक्ती सिंग कल्याणी तसेच विविध समाज संघटनांचे प्रतिनिधी, पुणे महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.



यावेळी शीख, लबाना, सिकलीगर , बंजारा, सिंधी, वाल्मिकी समाज तसेच इतर अल्पसंख्याक समाजांच्या पदाधिकाऱ्यांना मा. महापौर व उपमहापौर यांनी येऊ घातलेल्या “हिंद दी चादर-श्री गुरु तेग बहादूर जी ३५० वे शहीदी समागम” या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी निमंत्रित केले.

सदर शहीदी समागम २८ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत ओवे मैदान, खारघर, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला असून राज्यभरातील तसेच इतर भागांतील भाविक व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

धर्मस्वातंत्र्य व मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी दिलेल्या त्यांच्या सर्वोच्च बलिदानाच्या स्मरणार्थ “हिंद दी चादर” म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गुरु तेग बहादूर जी यांना ही अभिवादनात्मक श्रद्धांजली आहे.

## फोनपेतर्फे बायोमेट्रिक ऑथेंटिकेशनसह युपीआय पेमेंट्स सुविधेची घोषणा

पुणे (दै. संध्या) :

फोनपेतर्फे आज युपीआय पेमेंट्ससाठी बायोमेट्रिक ऑथेंटिकेशन सुविधा सुरू केल्याची घोषणा करण्यात आली असून, या सुविधेमुळे वापरकर्त्यांना अधिक जलद आणि सहज ‘वन-टच’ पेमेंट अनुभव मिळणार आहे.

या नव्या सुविधेच्या माध्यमातून युजर त्यांच्या स्मार्टफोनमधील नेटिव्ह सिक्युरिटी, उदा. फिंगरप्रिंट किंवा फेस रिकग्निशनचा वापर करून व्यवहार ऑथोराइझ करू शकतात, त्यामुळे प्रत्येक व्यवहारासाठी युपीआय पिन मॅन्युअली एंटर करण्याची आवश्यकता राहणार नाही. या सुविधेमुळे, फोनपे हे मोठ्या प्रमाणावर ही क्षमता प्रत्यक्षात उपलब्ध करून देणाऱ्या आघाडीच्या पेमेंट प्लॅटफॉर्मपैकी एक ठरले आहे. युजरच्या पेमेंट प्रवासातील सामान्य अडथळे दूर करून डिजिटल पेमेंट्सची सुरक्षितता आणि विश्वासार्हता अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने ही सुविधा तयार करण्यात आली आहे. डिव्हाइस स्तरावरील बायोमेट्रिक व्हेरिफिकेशनचा वापर केल्यामुळे गर्दीच्या सार्वजनिक ठिकाणीही युजर सुरक्षितपणे व्यवहार करू शकतात आणि ‘शोल्डर सर्फिंग’ किंवा युपीआय पिन उघड होण्याचा धोका प्रभावीपणे टाळला जातो. सुरक्षिततेबरोबरच, विसरलेला किंवा चुकीचा युपीआय पिन एंटर केल्यामुळे होणारे व्यवहार अयशस्वी होण्याचे प्रमाण कमी झाल्याने या एकात्मिक सुविधेमुळे व्यवहार यशस्वी होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढते.

## “ट्रायंगल” मराठीतील पहिला स्पाय थ्रिलर चित्रपट

पुणे (दै. संध्या) :

■ "ट्रायंगल"चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

हिंदी किंवा दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये आजवर अनेक स्पाय थ्रिलर चित्रपट झाले आहेत. मात्र, मराठी चित्रपटात असलेली स्पाय थ्रिलर चित्रपटांची उणीव आता भरून निघणार आहे. "ट्रायंगल" हा मराठी चित्रपटसृष्टीतला पहिला स्पाय थ्रिलर चित्रपट ठरणार असून, अर्जून करे हा नवा चेहरा या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. देशभक्ती, निष्ठा आणि धाडसाची अनोखी गोष्ट या निमित्ताने मराठी भाषेतून मोठ्या पडद्यावर पाहता येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आले आहे.




वैष्णवी फिल्म्सची निर्मिती असलेल्या "ट्रायंगल" या चित्रपटाची निर्मिती विकी सूर्यवंशी आणि सुखदेव आढाव यांनी केली असून लेखन आणि दिग्दर्शन विकी सूर्यवंशी यांनी केलं आहे. राजकीय आणि गुप्तधार्मिक जगतातील गुंतागुंत या चित्रपटात मांडण्यात आली आहे. भारताच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली इंडियन ओशन सिक्युरिटी सिस्टिम डॉक्युमेंट्स चोरी करण्याचा प्रयत्न परदेशी संस्था करतात आणि सुरू होतो एक आंतरराष्ट्रीय खेळ... वेगवान कथा, उत्कृष्ट ॲक्शन सिक्वेन्स हे चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे. तांत्रिक बाजूंवरही हा चित्रपट खिळवून ठेवणारा आहे.

"ट्रायंगल" चित्रपटात अर्जून करे, पूनम कापसे, आरती पुरी, ऋत्विक रास्ते, अलोक बसके, शरद लाडगे, भक्ती साधू अशी दमदार स्टारकास्ट या चित्रपटात आहे. कुणाल कांबळे हे या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरचं कथानक मुंबई, गोव्यासह ठिकठिकाणी चित्रीत करण्यात आलं आहे. एक मोठा पट या चित्रपटातून मांडण्यात आला आहे. त्यामुळे स्पाय थ्रिलर हा प्रकार आवडणाऱ्या प्रेक्षकांसाठी हा चित्रपट पर्वणी ठरणार आहे. त्याशिवाय उत्तम कथेमुळे प्रेक्षकांचं पुरेपूर मनोरंजन या चित्रपटात आहे.

मराठी चित्रपटांना वेगळ्या उंचीवर घेऊन जाण्याचा प्रयत्न "ट्रायंगल" या पहिल्या स्पाय थ्रिलर चित्रपटातून करण्यात आला आहे. मराठी चित्रपटांची चाकोरी मोडून एक दमदार चित्रपट मोठ्या पडद्यावर पाहण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे आता देशभक्ती, निष्ठा आणि धाडसाची अनोखी गोष्ट या निमित्ताने मराठी भाषेतून पाहण्यासाठी प्रेक्षकांनी सज्ज व्हायला हवं. लवकरच या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली जाणार आहे.

## यल्लमा देवीचा चांदीचा मुकुट चोरणाऱ्या आरोपीला अटक

पुणे (दै. संध्या) :

येरवडा परिसरातील यल्लमा देवीच्या मंदिरातून चांदीचा मुकुट चोरी करणाऱ्या आरोपीला लक्ष्मी नगर पोलीस स्टेशनच्या पथकाने अटक केली आहे. शिवराम पापा काळे (वय ४७, रा. सुरक्षा नगर, येरवडा) असे अटकेत घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणी दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी येरवडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक १२१/२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली लक्ष्मी नगर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने तपास सुरू केला.



घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसतानाही पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि परिसरातील इतर सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा माग काढला. येरवड्यातील सुरक्षा नगर परिसरात सापळा रचून आरोपीचा पाठलाग करत त्याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपीकडून यल्लमा देवीचा सुमारे ७०० ग्रॅम वजनाचा, अंदाजे १ लाख ८४ हजार रुपयांचा चांदीचा मुकुट जप्त करण्यात आला.

कारवाईदरम्यान कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याची पोलिसांनी विशेष काळजी घेतली.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, परिमंडळ ४ चे उपायुक्त चिलीमुला रजनीकांत आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

तपास पथकात वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम, सहायक पोलीस निरीक्षक रविकांत नंदनवार तसेच पोलीस कर्मचारी गायकवाड, शेख, वायाळ, जाधव, शिंदे, कांबळे, ओंबसे व परदेशी यांनी सहभाग घेतला.

## विद्यार्थ्यांसाठी अडोबीची मोठी घोषणा

पुणे (दै. संध्या) :

■ सर्जनशील क्षेत्राला चालना देण्यासाठी मोफत साधनसामग्री उपलब्ध

भारतातील सर्जनशील अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी अडोबी या जागतिक सर्जनशील तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीने विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ‘इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६’मध्ये कंपनीने जाहीर केले की, देशभरातील मान्यताप्राप्त उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांना फोटो संपादन, दस्तऐवज व्यवस्थापन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित निर्मिती साधने मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहेत. या उपक्रमामुळे लाखो विद्यार्थ्यांना नव्या युगातील कौशल्ये आत्मसात करता येणार असून देशातील पुढील पिढीचा मनुष्यबळ अधिक सक्षम होणार आहे. भारत सरकारच्या कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्रित धोरणाशी सुसंगत राहून हा निर्णय घेण्यात आल्याचे कंपनीने स्पष्ट केले. केंद्र सरकारने २०३० पर्यंत ॲनिमेशन, दृश्य प्रभाव, गेमिंग आणि कॉमिक्स क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट ठेवले आहे.

## ‘गणेश कार्तिकेय’ मालिकेत भगवान शिवाची शक्ती साधण्यासाठी पूर्ण मौन धारण करतो

पुणे (दै. संध्या) :

सोनी सबवरील पौराणिक गाथा गाथा शिव परिवार की – गणेश कार्तिकेय भक्ती, सामर्थ्य आणि दिव्य ध्येयाची प्रभावी कहाणी रंगवत आहे. या मालिकेच्या केंद्रस्थानी आहे अविनेश रेखी, जो भगवान शिवाची भूमिका साकारत आहे. ही भूमिका केवळ प्रभावी उपस्थितीच नव्हे तर गहन शांततेचीही मागणी करते.

अविनेश रेखीची तयारी दिग्दर्शक “ॲक्शन” म्हणण्याच्या खूप आधीपासून सुरू होते. लाईट्स, भव्य वेशभूषा आणि क्रूच्या हालचालींच्या गडबडीत तो सेटवर काही शांत क्षण शोधतो. विशेष म्हणजे, निर्मिती टीमने खास “सायलन्स रूम” तयार केली आहे. शूटिंगच्या गोंगाटापासून दूर अशी जागा, जिथे अविनेश स्वतःला केंद्रित करतो आणि दिव्य दृश्यांसाठी सज्ज होतो. या मौनाच्या क्षणांमुळे तो गोंधळापासून दूर जातो आणि भगवान शिवाच्या आध्यात्मिक गहनतेशी जोडला जातो. शूटिंगपूर्वीची ही स्थिरता त्याचा आधार बनते. वेशभूषेत उभा राहून डोळे मिटणे, श्वास नियंत्रित करणे किंवा दृश्याचा सराव करणे. या सगळ्यातून अविनेश आपल्या पात्रातील संयम आणि सौंदर्य आत्मसात करतो. त्याच्यासाठी भगवान शिवाची भूमिका म्हणजे नाट्यमय उंची नव्हे, तर नियंत्रित ऊर्जा आणि शांत सामर्थ्य.



आपल्या प्रक्रियेबद्दल बोलताना अविनेश रेखी म्हणतो, “सेटवर नेहमीच लाईट्स लावणे, शेवटच्या क्षणी टच-अप्स, कॅमेरा रिहर्सल्स अशा गडबडी सुरू असतात. पण मी महत्त्वाच्या दृश्यांपूर्वी आमच्या सायलन्स रूममध्ये जाण्याचा नियम केला आहे. ती अशी जागा आहे जिथे मी फक्त स्थिर राहू शकतो. भगवान शिव अपार सामर्थ्याचे प्रतीक आहेत, पण त्याचबरोबर गहन ध्यान आणि शांततेचेही. तो समतोल दाखवण्यासाठी मला आतून केंद्रित व्हावं लागतं. त्या शांत क्षणांमुळे माझा श्वास नियंत्रित होतो, विचार स्वच्छ होतात आणि मी पूर्णपणे भगवान शिवाच्या दिव्यतेत तल्लीन होतो. ‘ॲक्शन’ म्हटल्यावर मी अविनेश म्हणून विचार करत नाही, तर भगवान शिव म्हणून प्रतिसाद देतो.” ‘गणेश कार्तिकेय’ पाहा सोमवार ते शनिवार रात्री 8 वाजता, फक्त सोनी सबवर.




## क्लासिक फियाटची वारी, महाबळेश्वरच्या वाटेवरी!

### फियाट क्लासिक कार क्लब ऑफ इंडियातर्फे पुणे ते महाबळेश्वर रॅली; देखण्या गाड्यांनी वेधले लक्ष

पुणे (दै. संध्या) :

पिढ्यानपिढ्या जतन केलेली, चमकदार क्रोमची किनार, गोलाईदार बॉडीची देखणी ठेवण आणि शांत पण दमदार आवाजात धावणारे इंजिन, हलके स्टिअरिंग, हॅन्डगिअर, क्लासिक ग्रील, स्लिक व रुबाबदार हेडलाईट्स अन लक्षवेधक फियाट कार्सचा क्लासिक नजराणा पाहून पुणेकर हरखले. 'क्लासिक फियाटची वारी, महाबळेश्वरच्या वाटेवरी' याप्रमाणेच फियाट कारचा ताफा शहरातून मार्गक्रमण करत महाबळेश्वरकडे रवाना झाला. १९५५ पासूनच्या विविध रंगांच्या २० पेक्षा अधिक क्लासिक गाड्यांनी या रॅलीत सहभाग घेतला.

फियाट क्लासिक कार क्लब ऑफ इंडियातर्फे या क्लासिक फियाट कार रॅलीचे शनिवारी आयोजन केले होते. पुणे ते महाबळेश्वर या निसर्गरम्य मार्गावर जुन्या काळातील देखण्या आणि जतन केलेल्या फियाट गाड्यांचा निघालेला ताफा रस्त्यावरून मार्गक्रमण करणाऱ्या नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. सहभागी वाहनचालकांनी आपल्या गाड्यांची मूळ रचना आणि वैशिष्ट्ये जपून ठेवली असल्याने वाहनप्रेमींना ऑटोमोबाईल इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. मार्गात अनेक ठिकाणी नागरिकांनी या गाड्यांचे छायाचित्रण करत सहभागींना दाद दिली. यावेळी आयोजक संजय प्रकाश ढेरे म्हणाले, “क्लासिक वाहनांचा वारसा जतन करणे आणि तरुण पिढीला या गाड्यांविषयी आकर्षण निर्माण करणे हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. अशा रॅलींमुळे वाहनप्रेमी एकत्र येतात आणि ऐतिहासिक वाहनसंस्कृती जिवंत राहते. १९५५ पासूनच्या विविध मॉडेलच्या फियाट कार असलेले आम्ही सर्वजण हा क्लब चालवतो. काळ्या, निळ्या, लाल, पांढऱ्या, हिरव्या अशा विविधरंगी व्हिंटेज कार घेऊन आम्ही महाबळेश्वर, गोवा, मुंबई, बंगळुरू, कन्याकुमारी असे विविध ठिकाणांना भेटी देत असतो." माझ्या वडिलांची ही गाडी असल्याने माझ्याशी त्याचा भावनिक बंध असून, ती चालवताना वडिलांचा सहवास मला मिळतो, असे भावनिक उद्गार ढेरे यांनी काढले.

शीतल सोनकांबळे यांनी सांगितले की, माझ्याकडे १९९१ मधील फियाट कार आहे. ही कार आमच्या कुटुंबासाठी केवळ वाहन नसून आठवणींचा ठेवा आहे. अनेक वर्षे जपून ठेवलेल्या या गाडीची देखभाल आम्ही स्वतः करतो आणि अशा रॅलीत सहभागी होताना तिचा खरा आनंद अनुभवायला मिळतो. लोकांच्या उत्सुक नजरा आणि कौतुकाचे शब्द हेच आमच्यासाठी सर्वात मोठे पारितोषिक असते.

## जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन



पुणे (दै. संध्या) :

हवेली तालुक्यातील कुंजीरवाडी येथे मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कुंजीर लॉन्स, पुणे-सोलापूर रोड येथे हा कार्यक्रम पार पडणार असून पुणे जिल्ह्यातील भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती अपेक्षित आहे.

सकाळी ९ वाजता पादुकांची मिरवणूक सुरू होणार असून सकाळी १० वाजता संतपीठावर पादुकांचे आगमन होईल. त्यानंतर आरती पार पडेल. सामाजिक उपक्रमांतर्गत दुर्बल व गरजू शेतकऱ्यांना ७५ कृषी औषध फवारणी पंपांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यानंतर गुरुपूजनास सुरुवात होईल. याच दिवशी उपासक दीक्षा सोहळाही संपन्न होणार आहे. दिवसभर गुरुपूजन, आरती, प्रवचन, उपासक दीक्षा आणि पादुकांचे दर्शन असा विविध धार्मिक कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. कार्यक्रमस्थळी भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

या कार्यक्रमासाठी पुणे जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरुपूजन व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान, नाणिजधाम (पश्चिम महाराष्ट्र सहपीठ) यांचे सहपीठ प्रमुख संजय गाडेकर, सहपीठ प्रमुख अमोल कुलकर्णी, व्यवस्थापक विनायक नाईक, जिल्हाध्यक्ष विजय बांदल आणि तालुका अध्यक्ष प्रदीप डिंबळे यांनी केले आहे.

# आरोग्य क्षेत्रासाठी टेक सोल्युशन्सचा युनिफाइड एआय प्लॅटफॉर्म

**टेक सोल्युशन्स भारताच्या ३७० अब्ज डॉलर्सच्या आरोग्य क्षेत्रात परिवर्तन घडवण्यासाठी इंडिया एआय मिशनशी सुसंगत स्केलेबल युनिफाइड एआय प्लॅटफॉर्म उभारणार**

**समावेशक आरोग्यसेवा पुरवठा सक्षम करण्यासाठी आणि लोकशाही पद्धतीने एआय उपलब्ध करून देत 'विकसित भारत'च्या दृष्टीकोनाला बळकटी**

चेन्नई (दै. संध्या) :

नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट 2026 च्या पार्श्वभूमीवर टेक सोल्युशन्स लिमिटेड ने आज एक व्यापक युनिफाइड एआय प्लॅटफॉर्म विकसित करण्याच्या आपल्या धोरणात्मक योजनेची घोषणा केली. आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला हा प्लॅटफॉर्म एक एकात्मिक डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लेयर म्हणून काम करेल, ज्यामुळे रुग्णालये, डायग्नोस्टिक प्रयोगशाळा, क्लिनिकल ट्रायल संस्था आणि क्लिनिक यांना कृत्रिम बुद्धिमत्ता उपाय सहजपणे स्वीकारता आणि वापरता येतील.

TAKE® Enabling Business Efficiencies

ही पुढाकार टेक सोल्युशन्सच्या प्रवासातील एक परिवर्तनात्मक पाऊल ठरते आणि समाजाच्या व्यापक हितासाठी एआय ला एक महत्त्वाचे विकास साधन म्हणून पुढे नेण्याच्या भारत सरकारच्या प्रयत्नांशी सुसंगत आहे. देश 370 अब्ज डॉलर्सच्या आरोग्य क्षेत्रासोबतच 197 अब्ज डॉलर्सच्या प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा संधी उघडण्यावर लक्ष केंद्रित करत असताना, हा प्लॅटफॉर्म "सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय" या समिटच्या मुख्य संकल्पनेला प्रतिबिंबित करतो, ज्यामुळे प्रगत तंत्रज्ञान प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचेल.

आरोग्य सेवा पुरवठादारांसाठी एआय चे लोकशाहीकरण: स्केलेबल डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर उभारणे आणि आरोग्यसेवा पुरवठ्यातील दरी कमी करणे या सरकारच्या प्राधान्याशी सुसंगत राहून, प्रस्तावित प्लॅटफॉर्म एक व्यापक हेल्थकेअर एआय मार्केटप्लेस आणि इंटिग्रेशन लेयर म्हणून कार्य करेल. यामुळे शहरी केंद्रांपासून ते दुर्लक्षित समुदायांपर्यंतच्या आरोग्यसेवा पुरवठादारांना विविध एआय-आधारित अनुप्रयोग एका एकात्मिक प्रणालीद्वारे सहज उपलब्ध होतील, वापरता येतील आणि व्यवस्थापित करता येतील.

तंत्रज्ञान स्वीकारण्यातील अडथळे, अंमलबजावणीतील गुंतागुंत आणि प्रारंभिक गुंतवणूक कमी करून हा प्लॅटफॉर्म परवडणाऱ्या आणि सुलभ आरोग्यसेवेच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला पाठबळ देतो. हा प्लॅटफॉर्म सार्वजनिक आणि खाजगी आरोग्य क्षेत्रातील महत्त्वाच्या अनेक वापर प्रकरणांना समर्थन देण्यासाठी तयार केला जात आहे, ज्यामध्ये पुढील बाबींचा समावेश आहे:

- निदान आणि पॅथॉलॉजी ऑटोमेशन: लवकर तपासणी आणि स्क्रीनिंग सक्षम करून तज्ज्ञांच्या कमतरतेवर मात.
- क्लिनिकल डिसिजन सपोर्ट सिस्टीम्स: डॉक्टरांना डेटा-आधारित अंतर्दृष्टी प्रदान करणे.
- रुग्णालयीन कार्यप्रवाह आणि ऑपरेशनल ऑटोमेशन: मोठ्या रुग्णसंख्येचे व्यवस्थापन करताना कार्यक्षमता वाढवणे आणि खर्च कमी करणे.
- क्लिनिकल ट्रायल ऑप्टिमायझेशन आणि रुग्ण डेटा इंटेलिजन्स.
- प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि सक्रिय आरोग्य व्यवस्थापनाचा विस्तार.

परिणामकारकता आणि शाश्वत वाढ साध्य करणे: जागतिक आणि देशांतर्गत आरोग्य क्षेत्र तंत्रज्ञान-चालित युगात प्रवेश करत असताना आणि आरोग्य क्षेत्रातील जागतिक एआय बाजारपेठ 2030 पर्यंत 180 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक होण्याची अपेक्षा असताना टेक सोल्युशन्स भारताच्या एआय-आधारित आरोग्य परिवर्तनाचा एक महत्त्वाचा सक्षमकर्ता म्हणून स्वतःची भूमिका मजबूत करत आहे.

क्लिनिकल परिणाम सुधारण्यासाठी आरोग्यसेवा पुरवठादार तंत्रज्ञानावरील खर्च वेगाने वाढवत आहेत, ज्यामुळे वास्तविक परिणाम देणाऱ्या स्केलेबल प्लॅटफॉर्मसाठी मोठी संधी निर्माण होत आहे. एकात्मिक एआय मार्केटप्लेस उपलब्ध करून देत टेक सोल्युशन्स मोठ्या प्रमाणावर आरोग्यसेवा पुरवठादारांना जोडण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे, ज्यामुळे स्केलेबल उत्पन्न निर्माण होईल आणि इंडिया एआय मिशन अंतर्गत समावेशक विकास आणि तांत्रिक स्वावलंबन या देशाच्या व्यापक सामाजिक-आर्थिक उद्दिष्टांना थेट पाठबळ मिळेल.

## बारामती शहर राष्ट्रवादीच्या महिला अध्यक्षांचा राजीनामा

बारामती (दै. संध्या) :

बारामती येथील शहर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यालयात एका महिलेचा वाढदिवस साजरा करण्याच्या कारणावरून वादंग निर्माण झाल्याने बारामती शहर महिला राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अध्यक्षा अनिता गायकवाड यांनी आपला पदाचा राजीनामा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे शनिवारी (ता. २१) पाठविला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनास काही आठवड्यांचाही कालावधी उलटलेला नसताना शारदा प्रांगणातील शहर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यालयात एका महिलेचा वाढदिवस साजरा करतानाची छायाचित्रे व क्लिप व्हायरल झाल्यानंतर त्यावर बरीच चर्चा झाली.

त्यानंतर अनिता गायकवाड यांनी तातडीने आपल्या पदाचा राजीनामा सादर केला.

या राजीनाम्यावर अद्याप सुनेत्रा पवार यांनी निर्णय घेतला नसल्याचे समजते. दरम्यान, बारामती नगरपरिषदेच्या निवडणुकीत अनिता गायकवाड या राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवीत होत्या, मात्र त्यांचा या निवडणुकीत पराभव झाला होता.

## शिस्त आणि राष्ट्रवादाची प्रेरणा देणारा हा चित्रपट - एकनाथ शिंदे

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी प्रेक्षकांना 'शतक: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के १०० वर्ष' हा चित्रपट पाहण्याचे आवाहन केले आहे.

शिस्त आणि राष्ट्रवादाची प्रेरणा देणारा हा चित्रपट असल्याचं त्यांनी सांगितलं आहे.एकंदरीतच या चित्रपटाबद्दल सांगताना ते म्हणाले की, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गौरवशाली प्रवासावर आधारित शतक हा चित्रपट आपल्या भेटीला येत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाच्या गीताचे अनावरण डॉ.




मोहन भागवत यांच्या हस्ते झाले, हे या कलाकृतीसाठी सर्वात मोठे पाऊल आणि आशीर्वाद आहे.

यापुढे ते म्हणाले की, "हा केवळ एक चित्रपट नसून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या स्थापनेपासून राष्ट्रभक्तीचे संस्कार आणि समाजसेवेचे व्रत स्वीकारलेल्या हजारो स्वयंसेवकांचा त्याग, कष्ट आणि समर्पणाची ही जिवंत गाथा आहे.

शिस्त आणि राष्ट्रवादाची प्रेरणा देणारा हा चित्रपट येणाऱ्या पिढीसाठी एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल, याची मला खात्री आहे. या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आणि संपूर्ण टीमचे मी मनापासून अभिनंदन करतो व त्यांना शुभेच्छा देतो. हा चित्रपट घराघरांत आणि जनसामान्यांपर्यंत पोहोचावा आणि प्रत्येक भारतीयाच्या मनात 'राष्ट्रप्रथम' हा भाव अधिक दृढ व्हावा, हीच सदिच्छा."

'शतक: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के १०० वर्ष' हा चित्रपट संघाचा विचारप्रवास, सामाजिक उपक्रम आणि देशसेवा यांचा आढावा घेतो. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या ट्रेलरनंतर या चित्रपटाबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

हा चित्रपट २० फेब्रुवारी २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### ट्रॅफिक मुक्त चाकणसाठी चक्काजाम आंदोलनाची गरज



चाकण (दैनिक संध्या) : विकास कामांच्या नावाखाली विविध प्रकल्पांचा दट्ट्या खेड तालुक्याच्या वाट्याला येत असताना पायाभूत सुविधा मात्र कोलमडल्या आहेत. नित्याच्या वाहतूक कोंडीने चाकणकर नागरिक अक्षरशः रडकुंडीला आले असून, ट्रॅफिक मुक्त चाकणसाठी चक्काजाम आंदोलनाची गरज निर्माण झाली आहे. चक्काजाम आंदोलनासाठी सर्वप्रथम पोलीस प्रशासनाला आंदोलनाची तारीख ठरवून पत्र देऊन त्याद्वारे सरकारला अल्टिमेटम देण्याची आवश्यकता आहे. या भागातील सगळया स्कूल, कॉलेजेसला सहभागी होण्यासाठी तसेच चाकण मध्ये तथाकथित एमआयडीसीची जी संघटना आहे, त्या संघटनेलाही आंदोलनात सहभागी होण्यासाठी एक पत्र दिले पाहिजे. चाकण शहरातील सर्व नोंदणीकृत सार्वजनिक मंडळे व राजकीय पक्ष यांना सहभागी होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. चाकण नगरपरिषद व सभोवतालच्या ट्रॅफिकच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या ग्रामपंचायतींना सहभागी होण्यासाठी पत्र देण्यासाठी सेवाभावी संस्था, संघटना महिला व युवकांनी पुढाकार घेतला पाहिजे. येथील तळेगाव चौक व आंबेठाण चौकात बेमुदत बंदचे प्रत्येकी एकेक असे दोन बॅनर लावून ज्यांना शक्य आहे त्यांनी आपापल्या भागात बेमुदत बंदचे बॅनर लावावे व या सामाजिक कार्यात सहभाग घ्यावा. चाकणला महामार्गावर शांततेत बंद सुरू करायचा असून जे यामध्ये सहभागी होणार नाहीत, त्यांनी सहभागी झालं पाहिजे. सर्वसामान्य जनता एका पायावर तयार होईल, असे येथील श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. संकेत मेदनकर यांनी सांगितले.

### काळिमा फासणारी घटना! 'कुरकुरे' देण्याचे आमिष दाखवून चिमुकलीवर अत्याचार

पुणे (दैनिक संध्या) : कुटुंबीयासोबत फलाटवर झोपलेल्या चार वर्षांच्या मुलीचे कुरकुरे घेऊन देण्याच्या बहाण्याने अपहरण करत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मंगळवारी (ता. १७) या प्रकरणी मध्य प्रदेशमधील एका आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी लोहमार्ग पोलीसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी पुणे रेल्वे स्टेशन येथे फलाट क्रमांक तीनवर मध्य प्रदेश मधील खंडवा येथे जाण्यासाठी एक मजुर कुटुंबीय जेवण करून फलाटवरच झोपले होते. त्यावेळी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास चार वर्षांच्या मुलीला एका व्यक्तीने कुरकुरे घेऊन देण्याच्या बहाण्याने फुस लावून तिच्या संमती शिवाय पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. रात्री दीड वाजता मुलीचे वडील हे लघुशंकेसाठी उठले असता त्यांना मुलगी दिसून आली नाही. त्यामुळे त्यानी सर्वांना जागे करत त्यांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला; ती मिळून आली नाही.

## 'सूर पहाडी' राग पहाडीवरील १११ गीतांची विक्रमी दीर्घ मैफल

पुणे (दै. संध्या) :



पुण्यातील "नादसप्तक संगीत विद्यालय" यांच्या वतीने भारतीय लोकसंगीत व शास्त्रीय संगीत परंपरेतील अत्यंत मधुर, आणि लोकप्रिय राग पहाडीवर आधारित १११ हिंदी व मराठी गीतांची आगळीवेगळी मैफल 'सूर पहाडी' आयोजित करण्यात आली आहे.

ही भव्य संगीत मैफल बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ठीक ११.११ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड, पुणे येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाद्वारे एशिया बुक ऑफ रेकॉर्डस् (Asia Book of Records) तसेच इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस् (India Book of Records) मध्ये नोंद करण्याचा प्रयत्नही करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शन प्रख्यात गायक व संगीतकार गिरीश पंचवाडकर,यांचे आहे. पुण्यातील संगीत, कला व विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे.

या मैफलीत गिरीश पंचवाडकर यांच्यासह नादसप्तक संगीत विद्यालयातील २५ विद्यार्थी, पहाडी रागावर आधारित गाणी सादर करणार आहेत.

संगीत संयोजनात, प्रसिद्ध युवा तबलावादक व विद्यालयाचे संचालक अक्षय पंचवाडकर, ज्येष्ठ कीबोर्ड वादक रशीद शेख,तसेच नागेश भोसेकर, प्रसन्न बाम, सचिन वाघमारे, रोहित साने, आदित्य निरगुडे आदी पुण्यातील नामवंत वादकांचा सहभाग लाभणार आहे.

19 वर्षे ते 99 वर्षे वयातील कलाकारांच्या सहभागाने सादर होणाऱ्या या कार्यक्रमात, राग पहाडीवर आधारित भावगीत, भक्तिगीत, नाट्यगीत, लावणी, अभंग, तसेच संत ज्ञानेश्वर माऊली व संत रामदास यांच्या अभंगांचा समावेश असेल. मराठी व हिंदी चित्रपट संगीतासोबतच शास्त्रीय पहाडी सरगम व तराणा (स्वररचना – गिरीश पंचवाडकर) हेही विशेष आकर्षण ठरणार आहेत.

युवा पिढीसाठी, या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे लोकप्रिय इन्फ्लुएंसर व रील स्टार अथर्व सुदामे हे विशेष अतिथी कलाकार म्हणून सहभागी होणार असून, त्यांच्या सादरीकरणाची उत्सुकता रसिकांमध्ये आहे, असे संचालक अक्षय पंचवाडकर यांनी सांगितले.

'सूर पहाडी' ही मैफल पुणेकर रसिकांसाठी स्वरांची एक अविस्मरणीय पर्वणी ठरणार आहे.

हा कार्यक्रम रसिकांना विनामूल्य असून, सर्वांनी या मैफलीचा आनंद घ्यावा असे आवाहन नादसप्तक तर्फे करण्यात आले आहे. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संतोष जोशी, नीरज फडके,रूपा इनामदार, दिपश्री डोळे, मयुरी देशपांडे, आदिती ताले, धवल ताले,गायत्री उंब्रजकर,भारत कोकीळ, रोहित परांजपे आदि परिश्रम घेत आहेत.


### जाहीर नोटीस

प्रति,

सर्व लोकांस विशेषतः गांव जाधववाडी (बोरीची), ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस,

आमच्या आशील सौ. नंदा पांडुरंग गाडगे, रा. साकोरी तर्फे बेल्हा, ता. जुन्नर, जि. पुणे तसेच मुंबई यांनी प्रत्यक्ष सांगितलेवरून व दिलेल्या माहितीप्रमाणे जाहीररित्या कळविणेत येते ते

येणे प्रमाणे :-

**२) मिळकतिचे वर्णन :-** तु. व जि. पुणे, पो. तु. दु. नि. नारायणगाव, ता. व पं. सं. जुन्नर, जि. प. पुणे पैकी ग्रामपंचायत जाधववाडीचे हद्दीतील मिळकत.

| ग. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ३८६/५ | ००.८० | ०२.२५ |
| त्यांसी जाधववाडी व बोरी गाव विभाजनापुर्वीचे वर्णन | | |
| स. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
| १२२९/५ | ००.८० | ०२.२५ |

येणे प्रमाणे वर्णनाची शेतजमीन त्यातील झाडझाडोरा तदंगभूत वस्तू व जाणे-येणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत गाव जाधववाडी (बोरीची), ता. जुन्नर येथील हिन्दूधर्मिय इसम सुरेश राजाराम गायकवाड याचे मालकी वहिवाटीची होती. सुरेश याने त्याचे हयातीत स्वतःचे कुटुंबाचे कायदेशीर तसेच नैसर्गिक अडचणीपोटी सदरहू मिळकत कायमखुषखरेदी देणेचे ठरवून उपरोक्त मिळकत आमचे आशिलांचे नजदीक असल्याने आमचे आशिलांस कायमखुषखरेदी देणेचा ठराव करून बयाणाची रक्कम स्विकारली. तशा आशयाची बयाणा पावतीही आमचे अशिलांस लिहून दिली. एव्हढेच नव्हेतर केवळ सदरील हस्तांतरापुर्वी सक्षम अधिकाऱ्यांची पुर्व परवानगीची आवश्यकता असल्याने आमचे आशिलांस किमतिची रक्कम स्विकारून नोंदणीकृत कधीही रद्द न होणारे मुखत्यारपत्र खरेदीखताचे अनुषंगाने व पुर्व परवानगीचे अनुषंगाने कार्यवाही करणेकरिता करून दिले. तसेच मिळकतिचा खुला व प्रत्यक्ष कब्जा जमिनीत जावून दिला व तशी ताबे पावतीही आमचे आशिलांस लिहून दिली. सबब गेली अनेक वर्षानुवर्षे वर नमूद मिळकत आमचे आशिलांचे कायदेशीर, शांततामय व प्रत्यक्ष ताबेवहिवाटीस असून सदरहू मिळकतिचे संदर्भात आमचे आशिलांनी जुन्नर येथील मे. दिवाणी न्यायाधीश यांचे कोर्टात रे.मु.नं. २९४/२०२४ चा सुरेश राजाराम गायकवाड हा मयत असल्यामुळे त्याचे वारस शांताराम सुरेश गायकवाड, छबुबाई रामदास कुऱ्हाडे, ललिता राजु जेवळीकर यांचेविरूध्द उपरोक्त मिळकत खरेदीखत करून मिळणेकरिता दावा दाखल केला असून त्याचे कामकाज न्यायप्रविष्ट आहे.

३) वस्तुस्थिती वर नमूद केलेप्रमाणे असताना उपरोक्त सुरेश याचे वारस शांताराम, छबुबाई व ललिता दि. ०९ मे २०२२ रोजी एक अनाधिकाराचा मुखत्यारपत्राचा दस्त श्री. सुमीत आनंदा पिंगळे, रा. यादववाडी, बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे यांचे नावे करून दिल्याचे आमचे आशिलांस नुकतेच समजते. परंतू तथाकथीत सुमीत आनंदा पिंगळे यांचे नावे अस्तित्वात आलेला दस्त आमचे आशिलांचे वर नमूद केलेली जमीन अग्रहक्काने खरेदी घेणेचे कायदेशीर हक्कावर व मिळकतीमधील ताब्यावर कायद्यानेच बंधनकारक नव्हता व नाही. परंतू केवळ काही आर्थिक लाभउठविण्याचे हेतुने उपरोक्त सुमीत आनंदा पिंगळे हे इसम वर नमूद मिळकत हस्तांतर करणेचे प्रयत्नात असून काही लोक त्यांचेशी तशी बोलणी करीत असल्याचे आमचे आशिलांस समजते. परंतू संबंधीत इसम नामे सुमीत आनंदा पिंगळे, रा. यादववाडी, बेल्हे, ता. जुन्नर, जि. पुणे यांचेबरोबर वर नमूद मिळकतिचे संदर्भात कोणीही खरेदी-विक्री, दान, गहाण, लिज, बक्षीस अगर अन्य कुठल्याही प्रकारचे तबदिलीचे व्यवहार व त्याअनुषंगाने करार-मदार करू नयेत. त्याचप्रमाणे कुठल्याही वित्त पुरवठा करणारे संस्था, बँका अगर खाजगी सावकारी करणारे इसमांनी करू नयेत. अन्यथा तसले कुठलेही व्यवहार व करार-मदार अगर वित्त पुरवठा आमचे आशिलांचे वर नमूद मिळकतींमधील हक्कावर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

**कुणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आगावू प्रसिध्दीस दिली असे. कळावे.**

**येणे प्रमाणे जाहीर नोटीस**

**दि. १५/०२/२०२६**

**श्री. कौस्तुभ पी. कर्पे**
**बी.एस.एल., एल.एल.एम.**
**ॲडव्होकेट "आशियाना",**
**"इंशान", ॐ शक्तीनगर, किल्ले शिवनेरी**
**पायथा, जुन्नर, जि. पुणे महा/१८३४/२०१४**
**मो. ७७६७०९३८६२**


## २७ फेब्रुवारी रोजी क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम चित्रपटाचा प्रीमियर होणार

पुणे (दै. संध्या) :




या वर्षाच्या सुरुवातीला क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळाले. आता हा चित्रपट जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी सज्ज झाला आहे. मराठी ZEE5 वर 27 फेब्रुवारी 2026 रोजी या चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित आणि क्षिती जोग व विराज गवस, उर्फी काझमी आणि अजिंक्य धमाल यांची निर्मिती केलेला क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा संवेदनशील सामाजिक विषयावरील चित्रपट आहे. मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याचा आनंद, जिद्द, शाश्वतता आणि सांस्कृतिक अभिमान यांचा गौरव या चित्रपटाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. समकालीन आव्हानांना सामोरे जाताना आपली मुळे आणि ओळख जपणाऱ्या एका मराठी शाळेचा आणि या शाळेशी संबंधित माणसांचा भावनिक प्रवास या चित्रपटात प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. मराठी भाषा गौरव दिनी या चित्रपटाचा डिजिटल प्रीमियर होणार असल्यामुळे या प्रसंगाला अधिक अर्थ प्राप्त झाला आहे. मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व आजही तितकेच कायम असल्याचा संदेश या निमित्ताने अधिक ठळकपणे अधोरेखित करण्यात आला आहे. सचिन खेडेकर, अमेय वाघ, प्राजक्ता कोळी (मराठी चित्रपटातील पदार्पण), क्षिती जोग, सिद्धार्थ चांदेकर, हरीश दुधाडे, पुष्कराज चिरपुटकर आणि कादंबरी कदम अशा उत्तम कलाकारांची मांदियाळी असलेल्या या चित्रपटाने चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांच्या मनाला भावला. आता डिजिटल प्रीमियरच्या माध्यमातून तो आणखी अनेकांना प्रेरणा देण्यासाठी सज्ज झाला आहे. सशक्त कथानक, प्रभावी अभिनय आणि मराठी माध्यम शिक्षणसंस्थांना दिलेली भावनिक मानवंदना यामुळे क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा चित्रपट पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या मनात घर करण्यास सज्ज झाला आहे. हा चित्रपट 27 फेब्रुवारी 2026 पासून केवळ मराठी ZEE5 वर पाहता येणार आहे.

चित्रपट मराठी ZEE5वर आणण्याबाबत झी मराठीच्या मुख्य चॅनल अधिकारी आणि मराठी ZEE5च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. म्हणाल्या, "मराठी भाषा दिवस हा आपल्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. पिढ्यान् पिढ्या चालत आलेली संस्कृती, ओळख आणि कथा सांगण्याची परंपरा जपणाऱ्या भाषेचा हा उत्सव आहे. क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम या चित्रपटाच्या मराठी ZEE5वरील प्रदर्शनाच्या माध्यमातून, या राज्याच्या सांस्कृतिक जडणघडणीत मराठी भाषा आणि मराठी शाळांचे महत्त्व अधोरेखित करणारी कथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा मान आम्हाला लाभत आहे.

ZEE5मध्ये आमची बांधिलकी केवळ कंटेंट उपलब्ध करून देण्यापुरती मर्यादित नाही. मराठी प्रेक्षकांना त्यांच्या स्वतःच्या भाषेत उत्कृष्ट कथा जाणून घेता येतील, अनुभवता येतील आणि त्यांच्याशी जोडता येईल, असे व्यासपीठ उभारण्याचा आमचा प्रयत्न आहे. या दिशेने आमचा 'लँग्वेज पॅक' उपक्रम हे महत्त्वाचे पाऊल आहे. या उपक्रमामुळे वापरकर्त्यांना मराठीत सहजपणे कंटेंट पाहता येतो आणि भाषा ही अडथळा न ठरता, दर्जेदार मनोरंजनापर्यंत पोहोचण्याचा दुवा ठरते. मराठी कंटेंट इकोसिस्टिम अधिक भक्कम करण्यासाठी आणि प्रेक्षकांना रुचतील अशा अर्थपूर्ण कथा सादर करण्यासाठी आम्ही सातत्याने कटिबद्ध आहोत."

निर्माती आणि अभिनेत्री क्षिती जोग म्हणाल्या, "क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम या चित्रपटाची निर्मिती एका खोल भावनिक जाणीवेतून झाली आहे.

एक निर्माती म्हणून मला नेहमीच असे वाटत आले आहे की सिनेमामध्ये संस्कृती जपण्याची, संवाद सुरू करण्याची आणि आपण कोण आहोत याची आठवण करून देण्याची ताकद आहे.

हा चित्रपट अत्यंत प्रेमाने आणि या चित्रपटातून देण्यात आलेल्या संदेशावर असलेल्या ठाम विश्वासातून साकारण्यात आला आहे. मातृभाषेतील शिक्षण हे केवळ भाषेपुरते मर्यादित नसून ओळख, आत्मविश्वास आणि सांस्कृतिक सातत्याशी जोडलेले आहे, हा त्याचा गाभा आहे. आता हा चित्रपट चित्रपटगृहांतून मराठी ZEE5सारख्या जागतिक व्यासपीठावर पोहोचताना पाहणे अत्यंत खास आहे.

यामुळे ही कथा काय उपलब्ध असेल, नव्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल आणि आपल्या परंपरेचा अभिमान निर्माण करताना प्रादेशिक शिक्षणाच्या भविष्यासंदर्भातील वैचारिक संवादालाही चालना मिळेल, अशी मला आशा आहे."

दिग्दर्शक हेमंत ढोमे यांनी पुढे सांगितले, "हा चित्रपट मराठी माध्यम शाळांचा आणि त्यांच्याशी जोडलेल्या भावनिक विश्वाचा उत्सव आहे. अभिमान, आपलेपणा आणि आपला भाषिक व सांस्कृतिक वारसा जपण्याचे महत्त्व या चित्रपटातून मांडण्यात आले आहे. चित्रपटगृहांत प्रेक्षकांकडून मिळालेले प्रेम भारावून टाकणारे होते. आता मराठी ZEE5च्या माध्यमातून असंख्य घरांपर्यंत आणि मनांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळत आहे."

मुख्य अभिनेता सचिन खेडेकर म्हणाले, "क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम हा केवळ एक चित्रपट नाही, तर तो आपल्या सामूहिक स्मृतींचे प्रतिबिंब आहे. आपल्यापैकी अनेकांनी मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेतले असून, त्या शाळांनी आपली मूल्ये आणि व्यक्तिमत्त्व घडवले आहे. त्या परंपरेचा सन्मान करणाऱ्या या कथेत सहभागी होता आले, याचा मला मनापासून आनंद आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना प्रस्तुत जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे वडगाव आनंद (आळेफाटा) येथील गट क्र. ३८२ खाते क्र. ३८१ यासी सिटी सर्व्हे क्र. ४०२ ते ४०६ हे सिटी सर्व्हे क्र. मिळालेले असून सदरच्या सिटी सर्व्हे क्रमांकावर उल्लेखित मिळकत व ७/१२ उताऱ्यावर दर्शवलेल्या मिळकती ह्या एकच असून क्षेत्र० हेक्टर १० आर ह्या सदरच्या मिळकती पैकी हेक्टर ४ आर हि मिळकत आमचे अशील विलास बाळाजी डुंबरे यांनी दि.०४/०५/१९८४ रोजी दस्त अनुक्रमांक ३१३ नुसार दुय्यम निबंधक नारायणगाव/आळे येथे नोंदवलेला असून त्यानुसार त्याची अंमलबजावणी ७/१२ सदरी फेरफार क्र.६४३ नुसार झालेली आहे. खरेदी दिनांकापासून खरेदी मिळकत ० हेक्टर ४ आर हि मिळकत आमचे अशील यांचे ताबे वहिवाटीत असून उर्वरित हेक्टर ६ आर हि मिळकत हि विवेक मधुकर नवले यांच्या ताबे वहिवाटीत आहे. सबब सदरच्या उपरोक्त उल्लेखित मिळकतीत सिटी सर्व्हे होत असताना चुकीच्या नोंदी झाल्यामुळे त्यावर नजरचुकीने चुकीच्या नावाचा केवळ पोकळीस्त उल्लेख झालेला आहे. सबब सदरच्या मिळकतीबाबत आमचे अशील हे योग्य ती कायदेशीर कार्यवाही करत असून आमचे अशील यांच्या ताबे वहिवाटीत असलेल्या मिळकतीचा कोणत्याही परिस्थितीत ताबा हा इतर कोणासही मिळणार नाही याची ह्या जाहीर नोटीस द्वारे नोंद घ्यावी तसेच सदरच्या मिळकतीचे संदर्भात कोणीही कोणताही हस्तांतरणक्षम व्यवहार करू नये याची नोंद घ्यावी याही उपर कोणीही व्यवहार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी हि संबंधित इसमांची राहील. सदरची जाहीर नोटीस हि कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची फसगत होऊ नये म्हणून आमचे अशील यांनी दिली असे. याही उपर कोणीही व्यवहार केल्यास त्याची सर्वोतोपरी जबाबदारी हि संबंधित इसम यांची राहील याची ह्या जाहीर नोटीस द्वारे नोंद घ्यावी.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**विलास बाळाजी डुंबरे**
**९७६६४७४०९४**

**Adv. Pravin P. Kakade**
**B.Sc.,M.B.A. LL.B. LL.M.**
**Anand Plaza, A-Wing, Office No. 8.**
**Alophata, Tal. Junnar, Dist. Pune.**
**Mob.: 7499662006/7709433857**

# “विकास नावापुरताच; राजकारण धंद्याचे अन् तोडपाणीचे”

## जुनेच प्रश्न, समस्याही त्याच.. नवे गडी, कारभार जुनाच..!

**पिंपरी (दै. संध्या) :**

■ बाळासाहेब जवळकर

आधी श्रीमंतीचा तोरा मिरवणाऱ्या आणि सद्यस्थितीत जवळपास भिकेलाच लागलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेत नऊ वर्षानंतर झालेल्या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे पुन्हा भारतीय जनता पक्षाची सत्ता आली. प्रतिकूल परिस्थिती आणि पूर्णपणे नकारात्मक वातावरण असतानाही भाजपने गेल्यावेळीपेक्षा सात जागा जास्त जिंकून (८४) महायुतीतील सहकारी पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसवर सलग दुसऱ्यांदा मात केली. बाकीच्या सगळ्या पक्षांचे पानिपत झाले, ते वेगळेच.

आयाराम-गयाराम, फोडाफोडी, दमदाटी, पळवापळवी, आरोप-प्रत्यारोप, तिकिटासाठी ‘रेट कार्ड’, निवडून येण्यासाठी पैशांचा जाळ आणि धूर....अशा नाट्यमय घडामोडीत आणि गढूळ राजकीय वातावरणात महापालिकेच्या निवडणुका पार पडल्या. अपुरा आणि दुषित पाणीपुरवठा, वाढती गुन्हेगारी, अनधिकृत बांधकामांचा जटील प्रश्न, रेडझोन, पूररेषा, अरूंद होत चाललेले रस्ते आणि वाढत चाललेली वाहतुकीची कोंडी, प्रदूषणाचा वाढता धोका, कचऱ्याची तीव्र समस्या असे जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचे सारे प्रश्न दुर्लक्षित राहिले. गेल्या चार वर्षांच्या प्रशासकीय काळात ‘न भूतो, न भविष्यती’ झालेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा बाजूला पडला. तब्बल ५० हजार हरकती प्राप्त झालेला आणि शहरनियोजनाचे ‘तीन तेरा’ वाजवणारा विकास आराखडा चर्चेत आलाच नाही.

एकीकडे वेगाने विकसित झालेले शहर म्हणून राज्यभरात पिंपरी-चिंचवडचा गौरव होतो. त्याच शहराची पर्यावरणाच्या दृष्टीने पूर्णपणे वाट लागलेली आहे, अजूनही शहराला देशोधडीला लावण्याचे काम बिनबोभाट सुरूच आहे, याकडे कोणाचेच लक्ष नाही. महापालिकेकडून कागदी घोडे नाचवले जातात. नसलेल्या गोष्टी दाखवून वेगवेगळे पुरस्कार ‘मॅनेज’ करून स्वत:चा उदोउदो केला जातो. प्रत्यक्षात, सगळ्याच बाबतीत महापालिकेच्या ‘दिव्याखाली अंधार’ आहे. ‘नदी सुधार’च्या नावाखाली हजारो कोटी घशात घालण्याचा घाट संगनमताने घातला गेला आहे. स्वार्थ आडवा येत असल्याने लाभार्थ्यांनी ‘तेरी भी चूप, मेरी भी चूप’ची भूमिका घेतली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात सगळ्यात मोठी समस्या पिण्याच्या पाणीपुरवठ्याची आहे. त्याकडे कधीही गांभीर्याने पाहिले गेले नाही. प्रचारकाळात शहराचा पाणीप्रश्न पूर्णपणे सोडवण्याची ग्वाही देणाऱ्या भाजपने सत्ताप्राप्तीनंतर लगेचच ‘२४ तास पाणी’ देता येणार नाही, अशी पलटी घेतली. ज्या विकास आराखड्यात करोडो रूपयांचे गैरव्यवहार झाल्याचा आरोप झाला, तो ‘तोडपाणी’चा आराखडा रद्द करण्याची मागणी शहरवासियांकडून होत होती. तथापि, तसे करता येणार नाही, अशी ‘अर्थ’पूर्ण भूमिका भाजपने घेतली.

‘आपण सारे भाऊ, मिळून खाऊ’ या न्यायाने सगळ्यांनी मिळून पालिका धुवून खाल्ली. सध्या पालिकेच्या तिजोरीत असलेला खडखडाट ही त्याचीच परिणीती आहे. आता या सगळ्याची भरपाई करण्यासाठी शहरवासियांच्या माथी आज ना उद्या करवाढीचा बोजा लादला जाणार आहे. इतरही मार्गांनी नागरिकांच्या खिशाला कात्री लावली जाणार, हे उघड गुपित आहे. पुढील पाच वर्षांत पालिकेत कसा एकांगी कारभार होऊ शकतो, त्याची ही प्रातिनिधीक उदाहरणे आहेत.

पिंपरी पालिकेत ‘नवे गडी, नवे राज्य’...असे वरकरणी वाटत असले तरी प्रत्यक्षात तसे काहीच नाही. काही गडी नवीन असले तरी राज्य जुनेच आहे. ‘कारभारी’ तेच आहेत. शहरवासियांच्या समस्या त्याच आहेत. वर्षानुवर्षे त्या सुटलेल्या नाहीत. प्रलंबित प्रश्नही जुनेच आहेत. यासाठी प्रयत्नपूर्वक ठोस कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. सुधारणांच्या आणि विकासाच्या नावाखाली वारेमाप उधळपट्टी होत आली आहे आणि यापुढेही होतच राहणार आहे. जनहिताच्या कामांना प्राधान्य मिळेल, ही शहरवासियांची अपेक्षापूर्ती आतापर्यंत झाली नाही, यापुढे ती होईल, याची शाश्वती नाही. पालिकेत ‘नवा अध्याय’ सुरू झाला असला तरी, तोच प्रचारकी थाट, तीच नौटंकी आणि आणि त्याच भ्रष्ट कार्यपध्दतीचे ग्रहण पालिकेला आहे. आतातरी चोर बाजाराप्रमाणे कारभार होऊ नये, अशी शहरवासियांची माफक अपेक्षा असणार आहे.

महापालिकेच्या तिजोरीत पुरता खडखडाट झाला आहे. चार आणे खर्च अपेक्षित होता, तिथे चाळीस रूपये खर्च करण्यात आले. प्रशासकीय काळात शेखर सिंह, प्रदीप जांभळे यांच्यासारख्या अनेक अधिकाऱ्यांच्या एकाधिकारशाही आणि मनमानीमुळे शहराचे जितके म्हणून वाटोळे व्हायचे होते, ते झाले आहे. पालिका कर्जबाजारी झाली. साळसुदपणाचा आव आणून मलिदा खाणारे हे अधिकारी ताठ मानेने इथून निघून गेले. पालिकेला खड्डयात घालणारे त्यांचे बहुतांश निर्णय संशयाच्या फेऱ्यात आहेत. प्रशासकीय काळातील सर्व कारभाराची उच्चस्तरीय चौकशी व्हायलाच हवी. निष्पक्षपणे चौकशी झाल्यास अनेक अधिकारी तुरूंगात दिसतील. मात्र, ईडीचे किंवा तत्सम अधिकारी डोळे झाकून बसले आहेत. परिणामी, पालिकेच्या कारभारात दिवसाढवळ्या दरोडेखोरी होत राहिली. यापुढेही सुरूच राहील.

मूळ राष्ट्रवादीचे प्रशांत शितोळे निवडणुकीपूर्वीच भाजपमध्ये आले. प्रचंड विरोध असतानाही वशिल्याने त्यांना उमेदवारी मिळाली. कसेबसे ते निवडून आले. असे असतानाही महत्त्वाचे आणि पालिकेच्या कारभाराच्या केंद्रस्थानी असलेले पक्षनेतेपद (पार्टी लीडर) त्यांना देण्यात आले. त्यावरून बरेच नाराजी नाट्यही झाले. दोन्ही कारभारी आमदारांचे ‘जॉईन्ट अकाऊंट’ असल्यामुळेच शितोळे यांच्याकडे ही मोठ्ठी जबाबदारी देण्यात आली. त्यांना पक्षनेते करण्यामागचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे ते या पदाला पुरेपूर न्याय देतील, याची सर्वांना खात्री आहे. विकासाची, धंदेवाल्यांची, व्यावसायिकांची आणि मुख्य म्हणजे कारभाऱ्यांची जी काही कामे करावी लागतील, ती करण्यात तथा करून घेण्यात शितोळे अनुभवी आणि वाकबगार आहेत. पहिल्या दिवसापासूनच आपल्या मूळ ख्यातीनुसार त्यांनी कामाला सुरूवात केलीच आहे.स्थायी समिती नामधारीच आहे. संदीप कस्पटे अध्यक्ष होतील किंवा अभिषेक बारणे होतील. प्रत्यक्षात कोणी ही झालं तरी ‘स्टॅंडिंग कमिटी’चा खरा कारभार बाह्य केंद्रामार्फतच होणार आहे. समितीला फक्त कोट्यवधी रूपयांना मंजुरी देण्याचे हमाली काम करायचे आहे.



शहराचे प्रथम नागरिक म्हणून भोसरीकर रवी लांडगे यांची निवड करण्यात आली. भाजपची पुन्हा सत्ता आल्यापासून शहरात ‘लांडगे पॅटर्न’ असल्याचा जयघोष होत होता. त्यानुसार, लांडगे परिवाराला पहिल्या महापौराचा मान मिळाला. रवी लांडगे महापौर होणे हा त्या पॅटर्नचाच एक भाग आहे. तसे पाहता रवी लांडगे यांना मोठा राजकीय वारसा आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये खऱ्या अर्थाने ज्यांनी भाजपची पायाभरणी केली, त्या दिवंगत शहराध्यक्ष अंकुश लांडगे यांची पुण्याई रवी यांच्या निवडीमागे आहे. ते रवी यांचे सख्खे चुलते होते. रवी यांचे वडील बाबासाहेब लांडगे देखील नगरसेवक आणि विरोधी पक्षनेते होते. रवी यांची काकी आशा अंकुश लांडगे तसेच पत्नी श्रध्दा लांडगे यांनीही नगरसेवकपद भूषवलेले आहे. शिवसेनेचे माजी शहरप्रमुख बाजीराव लांडे हे त्यांचे सासरे होते. असे असले तरी, रवी लांडगे यांनी राजकीय परिपक्वता येण्यापूर्वीच अर्थात वेळेआधीच महापौरपद स्वीकारले आहे. सलग दोनदा बिनविरोध नगरसेवक झाले असले तरी, त्यांच्याकडे कोणत्याही मोठ्या पदावर काम करण्याचा अनुभव नाही. कामाची धडाडी दिसून येईल, असे काही त्यांनी करून दाखवलेले नाही. पालिका प्रशासनावर त्यांची पकड नाही. त्यामुळे लांडगे यांच्यादृष्टीने महापौरपदाचा मुकुट ‘काटेरी’ ठरू शकतो. तूर्त त्यांची एकूणच कार्यपध्दती पाहता मिळालेल्या संधीचे सोने करत महापौरपदाच्या काळात भरीव कामगिरी करून दाखवण्याचे त्यांचे मनसुबे दिसून येतात.

पिंपरी पालिकेच्या स्थापनेपासूनच भ्रष्टाचाराची कीड लागलेली आहे. कोणत्याही सत्ताधारी पक्षाला किंवा विरोधी बाकांवर बसणाऱ्यांना यात डावे-उजवे करता येणार नाही. आपापल्या कुवतीनुसार प्रत्येकाने पालिकेचे लचके तोडण्याच्या कामात हातभार लावला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे १९९९ पासून २०१७ पर्यंत पालिकेचा कारभार होता, त्या काळात पालिका लुटण्याची कोणतीही कसर राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी ठेवली नव्हती. ‘अति तेथे माती’ ही म्हण देखील छोटी वाटेल, इतक्या बेसुमार आणि बेलगाम पध्दतीने भ्रष्टाचार झाला. त्यामुळेच पालिकेतील सत्ता राष्ट्रवादीला गमवावी लागली. राष्ट्रवादीचा नंगानाच चव्हाट्यावर आणून भाजपने २०१७ मध्ये पालिका ताब्यात घेतली. प्रथमच स्थानिकांच्या हातात पालिकेचा कारभार गेल्याने आता काहीतरी भरीव सुधारणा होईल, असा आशावाद शहरवासियांकडून व्यक्त होऊ लागला होता. प्रत्यक्षातील कारभार पाहून सर्वांचाच भ्रमनिरास झाला. भाजपची सत्तेची पाच वर्षे आणि प्रशासकीय काळातील चार वर्षे अशा सलग नऊ वर्षांच्या काळात सत्ताधाऱ्यांनी व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या अधिकाऱ्यांनी सर्व मर्यादा ओलांडल्या, भ्रष्ट कारभाराचा कळस गाठला.

अशा परिस्थितीत, गेल्या काही वर्षातील पालिकेच्या कारभाराची सखोल चौकशी झालीच पाहिजे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. आधी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी, नंतर विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसेविका सुलभा उबाळे यांच्यासह अनेकांनी श्वेतपत्रिका काढण्याची मागणी केली आहे. प्रचाराच्या गरमागरमीत अजितदादांनीही पालिकेच्या गैरकारभाराची लक्तरे काढली होती. या भ्रष्टाचाराची कसून चौकशी करण्याची ग्वाही त्यांनी जाहीरपणे दिली होती. आता अजितदादा हयात नाहीत. राज्यात आणि केंद्रात भाजपचेच सरकार आहे. सगळी शासकीय यंत्रणा भाजपच्या दावणीला बांधलेली आहे. त्यामुळे भाजपच्या ताब्यात असलेल्या पालिकेच्या कारभाराची कोणतीही चौकशी होण्याची किंवा एखाद्या दोषीला शिक्षा होण्याची सूतराम शक्यता नाही.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वायसीएम रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह : भाऊसाहेब भोईर

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वाय.सी.एम.एच.) येथील सुरक्षा व्यवस्थेबाबत गंभीर त्रुटी असल्याचा मुद्दा समोर आला आहे. विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी रुग्णालयाच्या पाहणी दौऱ्यानंतर आयुक्तांकडे लेखी निवेदन सादर करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. भेटीदरम्यान रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर सक्षम सुरक्षा यंत्रणा नसल्याचे निदर्शनास आल्याचे त्यांनी नमूद केले. येणाऱ्या नागरिकांची मेटल डिटेक्टर मशीन किंवा बॅग तपासणी यंत्राद्वारे तपासणी होत नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत आढळल्याचे निवेदनात म्हटले आहे. भाऊसाहेब भोईर यांनी म्हटले आहे की, शहरातील समाजकंटकांकडून रुग्णालय परिसरात अनुचित व हिंसक प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत रुग्ण, डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. बॉम्ब किंवा इतर घातक शस्त्रांच्या वापराची शक्यता लक्षात घेता प्रवेशद्वारावर अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा उभारणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर मेटल डिटेक्टर मशीन व बॅग स्कॅनिंग मशीन बसवण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, या मागणीवर महानगरपालिकेकडून काय भूमिका घेतली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. रुग्णालयात दररोज हजारो नागरिक उपचारासाठी येत असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



### पोलिसांची मोठी कारवाई; बीडमधील सराईत गुन्हेगार अटकेत, 4 चैन चोरीचे गुन्हे उघड

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरात वाढत्या चैन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने मोठी कारवाई करत बीडमधील सराईत गुन्हेगाराला अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे २८ ग्रॅम ५०० मिलीग्रॅम वजनाचे अंदाजे ४ लाख १० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली १ लाख ५० हजार रुपये किमतीची मोटारसायकल असा एकूण ५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. शहरात मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेल्याच्या घटना घडल्या होत्या. या गुन्ह्यांचा समांतर तपास करत असताना मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने तब्बल २०० ते २५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे हा गुन्हा बीड येथील रेकॉर्डवरील आरोपी गणेश भारत गिरी याने केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सापळा रचून आरोपीला बीडमधून ताब्यात घेतले. पुढील तपासात आरोपी गणेश गिरी याच्याविरुद्ध पिंपरी, दिघी, निगडी आणि चिखली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याचे समोर आले. तपासादरम्यान त्याने हे गुन्हे त्याचे साथीदार रोहन राजू जाधव, पंकज गणेश दिवटे, सुमित सोपान चव्हाण आणि ओमकार रामेश्वर लाटे यांच्या मदतीने केल्याची कबुली दिली. यापैकी सुमित सोपान चव्हाण यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील कारवाईसाठी त्याला चिखली पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे. या कारवाईमुळे शहरातील चैन चोरीच्या घटनांना आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मोशी परिसरात भीषण ‘हिट अँड रन’; मद्यधुंद कंटेनर चालक ताब्यात

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड शहरातील मोशी परिसरात सोमवारी उशिरा रात्री भीषण ‘हिट अँड रन’ची घटना घडली. मद्यधुंद अवस्थेत कंटेनर चालवणाऱ्या चालकाने बेफाम वेगात वाहन चालवत सात ते आठ चारचाकी वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातात अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले असून काही नागरिक जखमी झाले आहेत. ही घटना रात्री सुमारे साडेअकराच्या सुमारास मोशीतील बोऱ्हाडेवाडी, राजमाता जिजाऊ चौक आणि हॉटेल सिल्वर ब्लू परिसरात घडली. प्राथमिक माहितीनुसार, संबंधित कंटेनर चाकण-हायवे रोडवरून मोशी भाजी मंडई चौक मार्गे टाटा मोटर्सच्या दिशेने जात होता. चालक मद्याच्या नशेत असल्याची माहिती समोर आली आहे. बोऱ्हाडेवाडी परिसरात पोहोचताच चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. सुसाट वेगाने धावणाऱ्या कंटेनरने समोरून येणाऱ्या वाहनांना एकामागून एक धडक दिली. तसेच रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या गाड्यांनाही जोरदार धडक बसली. परिणामी अनेक वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला असून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, कंटेनरसमोर येणारे प्रत्येक वाहन उडवत तो पुढे सरकत होता. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले आणि रुग्णालयात हलवण्यास मदत केली.

## देखभाल दुरुस्तीसाठी २३ फेब्रुवारी रोजी शहरातील पाणीपुरवठा बंद राहणार



**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से.क्र. २३ येथील स्थापत्य व विद्युत विषयक कामे तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या कामांसाठी सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेत कोणताही खंड पडू नये, यासाठी वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से.क्र. २३ येथील स्थापत्य व विद्युत विषयक कामे तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या कामांसाठी सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे सोमवार, दिनांक २३/०२/२०२६ रोजी पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व भागांचा संध्याकाळचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद राहणार आहे. तसेच या कामांचा परिणाम म्हणून दुसऱ्या दिवशी मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी या बाबीची नोंद घ्यावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

पाणी पुरवठा बंद कालावधीत नागरिकांनी मनपाकडील उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. देखभाल दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्नशील असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.पाणीपुरवठ्यातील या तात्पुरत्या अडचणीसाठी नागरिकांनी समजून घेऊन मनपास सहकार्य करावे.

**– विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## नगरसेवक प्रमोद कुटे पहिल्याच सभेत आक्रमक; प्रभागासह शहरातील विविध प्रश्नांनावरून प्रशासनाला धरले धारेवर



आकुर्डी प्रभागात मोकाट कुत्र्यांची संख्या इतक्या मोठ्या प्रमाणावर आहे की रस्त्या-रस्त्यावर २०-२५ कुत्री बसलेली असतात ती रात्री अपरात्री कामावरून येणाऱ्या नागरीकांच्या अंगावर धावून जातात. त्यामुळे मोठया प्रमाणात अपघात होत आहेत. कुत्र्यांची दहशत निर्माण झाली आहे, वेळोवेळी मागणी करूनही कोणत्याच प्रकारची कारवाई होत नाही. चिंचवड स्टेशन ते निगडी हरित सेतू प्रकल्प केल्यामुळे त्याठिकाणी रस्ता अरुंद झाला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली आहे. टू व्हीलर,फोर व्हीलर पार्किंग सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिक रस्त्यावर गाड्या उभ्या करतात. त्यावर ट्रॅफिक विभाग दंडात्मक कारवाई करत आहे. जोपर्यंत महापालिकेकडुन पार्किंगची व्यवस्था होत नाही तोपर्यंत त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करू नये. निगडी चौक ते चिंचवड स्टेशन चौक मेट्रोचे काम सुरू असल्याने सर्व्हिस रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. मोठा अपघात घडण्याआधी त्याठिकाणी दुरुस्तीचे काम करण्यात यावे, अशा विविध प्रश्नांवर नगरसेवक कुटे यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत आकुर्डीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक प्रमोद कुटे चांगलेच आक्रमक झाले. प्रभागासह शहरातील विविध प्रश्नांनावरून प्रशासन धारेवर धरले. नागरिकांना तत्काळ स्वच्छ आणि सुरळीत पाणीपुरवठा करण्याची मागणी केली. त्याचबरोबर ५५ हजार हरकती आलेला महापालिकेचा विकास आराखडा रद्द करण्याची मागणी आक्रमकपणे केली. नगरसेवक प्रमोद कुटे यांनी विविध विषयांवर अभ्यासपूर्ण भाषण केले. कुटे म्हणाले, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विकास आराखड्यावर ५५,००० हरकती दाखल झाल्या आहेत. त्यामुळे हा आराखडा रद्द करून नवीन आराखडा तयार करण्यात यावा. पिंपरी-चिंचवड शहरात होणारा पाणीपुरवठा अतिशय विस्कळीत व गढूळ पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिक मोठ्या संख्येने आजारी पडत आहे.

त्यावर उपाययोजना कराव्यात. शहरातील हवेची गुणवत्ता (AQI) जवळजवळ १५० च्या वर गेलेला आहे. त्यामुळे नागरिकांना श्वसनाचे, फुफुसाचे आजार होत आहे. यावर आपण काय उपाययोजना केल्या आहेत याची माहिती द्यावी.

## शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांनी विविध प्रश्नांवरून प्रशासनाला घेरले

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी-चिंचवड शहराला होणारा प्रदूषित पाणीपुरवठा, मोकाट श्वानाची दहशत, प्रशासकीय राजवटीत झालेला चुकीचा कारभार अशा विविध प्रश्नांवरून शिवसेना गटनेते विश्वजित बारणे पहिल्याच सर्वसाधारण सभेत महापालिका प्रशासनाला घेरले. विश्वजित यांनी पहिलेच भाषण अभ्यासपूर्ण आणि इंग्रजीमध्ये भाषण केले. विश्वजित यांचे भाषण सुरू असताना सभागृह शांत होते. त्यांनी अभ्यासपूर्ण मांडणीने सभागृहाचे लक्ष वेधले. विश्वजित बारणे यांनी पाणी प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधले. शहरातील पाणी प्रश्न अतिशय गंभीर झाला आहे. विस्कळीत, अपुरा, दूषित, अनियमित पाणीपुरवठा होत आहे. विस्कळीत पाणी पुरवठ्यामुळे नागरीक त्रस्त आहेत. महापालिका रावेत बंधाऱ्यातून अशुद्ध पाणी उपसा करते. येथील पाणी अतिशय दूषित आहे. येथील पाणी उचलून महापालिका त्यावर प्रक्रिया करून नागरिकांना देत आहे. मात्र, हे पाणी अतिशय दूषित असून या पाण्यामुळे भविष्यात कॅन्सरचे रुग्ण वाढण्याची भीती विश्वजित बारणे यांनी व्यक्त केली. मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रयत्नातून शिवणे येथे बंधारा बांधला आहे. महापालिकेने रावेतऐवजी शिवणे बंधाऱ्यातून शुद्ध पाणी उचलावे. त्यावर प्रक्रिया करून शहराला पाणीपुरवठा करावा. चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत अनागोंदी कारभार झाला आहे. अधिकाऱ्यांनी जनहिताची कोणतीही कामे केली नाहीत. खर्चीक कामे काढण्यावर भर दिला. परिणामी, प्रशासकीय राजवटीत महापालिका कर्जबाजारी झाली आहे. प्रशासकीय राजवटीमधील कामांची यादी प्रसिद्ध करावी. त्याचे लेखापरीक्षण करावे. जलनिस्सारण वाहिनीचे काम दर्जेदार झाले नाही. वाहिनी तुंबत आहे. त्यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याकडेही बारणे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. थेरगाव परिसरात मोकाट श्वानाचा प्रश्न अतिशय गंभीर झाला आहे. टोळीने श्वान फिरतात. निवडणुकीमध्ये प्रचारासाठी सर्व उमेदवारांनी रॅली काढली असेल. त्याचप्रमाणे थेरगाव परिसरात रात्रीच्या वेळी श्वानाची रॅली निघते. त्यामुळे मोकाट श्वानाचा बंदोबस्त करावा. नसबंदी वाढवावी. श्वानासाठी शेल्टरची सुविधा निर्माण करण्याची मागणीही बारणे यांनी केली. महापालिका सभागृहात माझ्यासह यश साने, सिद्धार्थ बनसोडे असे तरुण नगरसेवक निवडून आले आहेत. आम्ही युवकांचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे महापौर रवी लांडगे यांनी तरुण नगरसेवकांना अधिक बोलण्याची संधी देण्याची मागणीही त्यांनी केली.

### विश्वजित यांना मोठे राजकीय करिअर

विश्वजित यांच्या पहिल्याच अभ्यासपूर्ण भाषणाचे अनेक नगरसेवकांनी कौतुक केले. विश्वजित गटनेते असून त्यांना मोठे राजकीय करिअर असल्याचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर म्हणाले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मेदनकरवाडीच्या उपसरपंचपदी अजित मेदनकर

चाकण (दैनिक संध्या) : प्रति जेजुरी म्हणून प्रख्यात असलेल्या खेड तालुक्यातील मेदनकरवाडी येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अजित ज्ञानोबा मेदनकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. ॲड. संकेत मेदनकर यांनी आपला उपसरपंच पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने इतरांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी म्हणून स्वखुशीने राजीनामा दिला होता. त्यामुळे हे पद रिक्त झाले होते. या पदासाठी मेदनकरवाडी ग्रामपंचायत कार्यालयात निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. अजित मेदनकर यांचा उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज दाखल झाल्याने व छाननीत त्यांचा अर्ज वैध ठरल्याने त्यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याची माहिती मेदनकरवाडीचे सरपंच अमोल साळवे व ग्रामपंचायत अधिकारी सुभाष धोत्रे यांनी दिली. मेदनकरवाडी ही खेड तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायतीचे उपसरपंच ॲड. संकेत मेदनकर यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेसाठी उपसरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच अमोल साळवे, सदस्य महेंद्र मेदनकर, संजय वाघमारे, मंगल मेदनकर, नीलम मेदनकर, स्वाती गवते, जयश्री भुजबळ, सुमन खरात, पल्लवी भुजबळ, सुरेखा मेदनकर, सिंधू मेदनकर, संभाजी मेदनकर, गणेश भुजबळ, विजय मेदनकर, सलोनी मेदनकर आदी उपस्थित होते. उपसरपंचपदी अजित मेदनकर यांची निवड झाल्याबद्दल ग्रामपंचायत अधिकारी सुभाष धोत्रे व सरपंच अमोल साळवे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

### शरद ख्रिस्ती यांचे निधन



सासवड (दैनिक संध्या) : ५० वर्षापेक्षा जास्त काळ सासवड शहरातील नागरिकांना भल्या पहाटे वृत्तपत्र वाचण्यासाठी देणारे शरद शांताराम ख्रिस्ती (वय ६७ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. आजही सासवड मधील वाचकांना कोण व्यक्ती आपल्या घरापर्यंत नियमित ठराविक वेळी वृत्तपत्र देते हे माहिती नाही. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात ख्रिस्ती यांना त्रास जाणवु लागल्याने पुण्यातील खाजगी रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले होते. मेंदूची शस्त्रक्रिया करून त्यांना नुकत्याच घरी पाठवण्यात आले होते. मात्र त्यानंतर अल्पावधीत त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित मुली असा परिवार आहे.

### जेजुरी मार्गावर रस्त्यावर स्पीड ब्रेकर टाकण्याची मागणी

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी मोरगाव अष्टविनायक महामार्गावर शेवाळे वस्ती येथे सतत अपघात होत असून या रस्त्यावर स्पीड ब्रेकर टाकावा अशी मागणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे सामाजिक कार्यकर्ते नवनाथ खोमणे व ग्रामस्थांनी केली आहे. जेजुरी मोरगाव महामार्गावर वाहनांची सतत वर्दळ असते. जेजुरी ते जेजुरी रेल्वे स्टेशन या रस्त्याच्या दोन्ही बाजूला नागरी वस्ती असून दोन्ही बाजूला शेती आहे. शेतीत जाण्यासाठी येथील शेतकऱ्यांना रस्ता क्रॉस करून ये जा करावी लागते, तसेच नजीक रेल्वे स्टेशन असून मोठ्या संख्येने भाविक पायी ये जा करत असतात. अनेकदा या रस्त्यावर अपघात होवून कित्येकांना जीव गमवावे लागले आहेत, तर अनेकजण जखमी झाले आहेत. येथील नागरिक, शेतकरी, भाविक यांच्या सुरक्षिततेसाठी जेजुरी मोरगाव रस्त्यावरील शेवाळे वस्ती दरम्यान स्पीड ब्रेकर टाकावे अशी मागणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे निवेदन देवून केली असल्याचे नवनाथ खोमणे यांनी सांगितले.



### 58 वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

जेजुरी (दैनिक संध्या) : तीर्थक्षेत्र जेजुरी नगरातील जनता शिक्षण संस्थेच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यालयातील 1968 69 सालच्या विद्यार्थ्यांनी 58 वर्षानंतर एकत्रित येत स्नेहसंमेलन साजरे केले. जेजुरी येथील सेवानिवृत्त शिक्षक नारायण आगलावे यांच्या पुढाकारातून सोशल मीडियावर ग्रुप तयार करून माजी विद्यार्थ्यांशी संपर्क साधून 35 माजी विद्यार्थ्यांना एकत्रित आणले. जेजुरी येथील जेष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन घेण्यात आले. यावेळी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव सांगितले. या स्नेहमेळावा साठी तत्कालीन शिक्षक हरिश्चंद्र कराळे, जेष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष शामकाका पेशवे, नगराध्यक्ष जयदीप बारभाई उपस्थित होते. यावेळी लेखक व माजी प्राचार्य डॉ. नारायण टाक यांनी आपल्या व्याख्यानात मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण आगलावे तसेच नियोजन आप्पा भंडारी, सदानंद आगलावे, शामराव जगताप, चंद्रकांत झगडे, सतेज राऊत, शिवाजी जगताप, प्रगती रोटे, मंदा बारभाई,दिलीप घोलप, ज्ञानोबा काळाने,सुरेश रासकर , शाम सोनवणे,आदींनी केले.

### जेजुरीत महिलांना मिळाले ए आय व सायबर सुरक्षा वर आधारित मोफत संगणक प्रशिक्षण

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश संघटक व जेजुरी नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ. अमृता संदिप घोणे यांच्या पुढाकारातून महिलांसाठी AI Cyber Security यावर आधारित १५ दिवसांचे मोफत संगणक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. हे प्रशिक्षण क्रिएटिव्ह कॉम्प्युटर्स, जेजुरी यांच्या माध्यमातून राबविण्यात आले. क्रिएटिव्ह कॉम्प्युटर्सचे संचालक भानुदास कोलते,रोहित कळमकर व सौ.अनिता भोईटे यांच्या सहकार्याने हे प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षणासाठी महिलांनी उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदवला.प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी महिलांनी उपक्रमाचे कौतुक केले. व आजच्या आधुनिक काळामध्ये प्रसार माध्यमांचा योग्य वापर करण्यासाठी महिलांना देण्यात आलेल्या या प्रशिक्षणासाठी सौ.अमृता संदिप घोणे व भानुदास कोलते यांचे आभार व्यक्त केले. आधुनिक तंत्रज्ञानामध्ये महिलांना सजग व प्रगत राहण्यासाठी ए आय व सायबर सिक्युरिटी वर आधारित १५ दिवसांचे संगणक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

# सायली शिंदे यांचा सन्मान



जेजुरी (दै. संध्या)

**पुणे जिल्हा नाभिक महामंडळाचा उपक्रम**

महाराष्ट्र नाभिक महामंडळ,पुणे जिल्हा शाखेचे जिल्हाध्यक्ष अशोक मगर यांच्या पुढाकारातून पुरंदर तालुका पंचायत समिती भिवडी गणातुन विजयी झालेल्या नाभिक भगिनी सौ.सायली डॉ. मनोज शिंदे यांचा पुणे जिल्हा महिला कार्यकारणीच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी पुणे जिल्हाअध्यक्ष अशोक मगर पदाधिकारी भाऊसाहेब यादव, तानाजी वाळुंजकर,तेजस पंडित, मनोज जाधव,आदिनाथ गायकवाड, सोमनाथ शिंदेराहुल जगताप,संतोष गोरे सुरज जाधव पुणे जिल्हा अध्यक्षा अनिता मगर,कविता यादव,पिंपरी चिंचवड शहर महिला अध्यक्ष रुपाली गोरे बारामती उपाध्यक्षा पुष्पा जाधव सुजाता वाळुंजकर पुणे जिल्हा युवक अध्यक्ष भारत मोरे, पुरंदर तालुका अध्यक्ष राहुल मगर पदाधिकारी तुकाराम भागवत सागर इभाड नवनाथ,मोरे,अजित शिंदे डॉ. मनोज शिंदे उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष अशोक मगर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की सौ. सायली शिंदे यांना पंचायत समिती सदस्य म्हणून मिळालेल्या संधीचे सोन करून आदर्श लोक प्रतिनिधी म्हणून ओळख निर्माण करावी. व समाज सेवा करण्याच्या मिळालेल्या संधीचे सोन करावे. असे आवाहन केले.

## ‘कीर्तन सेवेने जिंकली मने’

### नायगावच्या चैतन्य महाराजांचा गौरव सोहळा

कोरेगावमुळ (दै. संध्या)



■ अवघ्या १२ व्या वर्षी कीर्तन सेवा; पहिला बाल कीर्तनकार म्हणून मान

अवघ्या १२ व्या वर्षी कीर्तन सेवेचा मान मिळवत नायगावचे सुपुत्र ह.भ.प. चैतन्य महाराज गोरक्षनाथ चौधरी यांनी गावाच्या इतिहासात नवे पान लिहिले आहे. पहिला बाल कीर्तनकार म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला असून नायगावसह परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भक्ती, संस्कार आणि परंपरेचा वारसा पुढे नेत असलेल्या चैतन्य महाराजांना घरातील धार्मिक वातावरणाची मोठी साथ लाभली. त्यांचे आजोबा ह.भ.प. अर्जुन गवाजी चौधरी हे गेल्या १५ वर्षांपासून चिंतामणी प्रासादिक दिंडीचे विश्वस्त तसेच कालभैरवनाथ प्रासादिक दिंडीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या सहवासातूनच चैतन्य महाराजांना लहानपणापासून भजन-कीर्तनाची आवड निर्माण झाली.

ह.भ.प. स्वप्निल महाराज काळाणे यांचे मार्गदर्शन आणि श्री माऊली बाल संस्कार वारकरी शिक्षण संस्था, आंबोडी (सासवड) येथे घेतलेले शिक्षण यांच्या जोरावर त्यांनी अल्पवयातच प्रभावी कीर्तन सादर केले. सातत्यपूर्ण साधना आणि अभ्यासामुळे त्यांनी पहिल्याच कीर्तन सेवेत उपस्थितांची मने जिंकली.

## हायवेवर रक्ताचा सडा! पिकअपची धडक अन् कोयत्याने सपासप वार

कुरकुंभ (दै. संध्या)

पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील मुकादमवाडी (ता. दौंड) येथे शुक्रवारी (ता. २०) रात्री तरुणाचा धारदार शस्त्रांनी निर्घृण खून (Pune Solapur Highway crime) करण्यात आला. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध दौंड पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पूर्ववैमनस्यातून ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

दौंड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मन्या उर्फ महेश संजय भागवत (वय २९, रा. पाटस, ता. दौंड) हा शुक्रवारी रात्री महेश मारूती टुले, युवराज शिंदे व राज होले यांच्यासमवेत दुचाकीवरून पाटसकडे जात होता. मुकादमवाडी पुलावर आल्यानंतर आनंद माकर, विकी शितकल व संतोष शितकल यांनी पिकअप वाहनाने त्यांच्या दुचाकींना पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत चौघेही महामार्गावर कोसळले.

यानंतर संशयित आरोपींनी महेश भागवत याच्यावर कोयता व इतर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. गंभीर जखमी झालेल्या भागवत याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

याबाबत महेश मारूती टुले (रा. पाटस) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आनंद माकर, विकी शितकल, संतोष शितकल (रा. अंबिकानगर, पाटस, ता. दौंड) तसेच त्यांच्या अन्य दोन अनोळखी साथीदारांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र केसरी स्पर्धेमुळे वाघोलीच्या नावलौकिकात भर

**रामकृष्ण सातव पाटील**

कोरेगावमुळ (दै. संध्या)



महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने आणि रामकृष्ण कर्तव्य फाउंडेशनच्या वतीने आयोजित ६८ व्या महाराष्ट्र केसरी २०२५-२६ स्पर्धेच्या नियोजनासाठी बैठक शुक्रवारी (दि. २० फेब्रुवारी) वाघोली येथील श्रेयस गार्डन मंगल कार्यालयात उत्साहात पार पडली.

बैठकीस स्पर्धेचे मुख्य आयोजक रामकृष्ण सातव पाटील, नगरसेवक रामभाऊ दाभाडे, ज्येष्ठ नेते कमलाकर सातव पाटील, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य संजय सातव पाटील, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके, बाळासाहेब सातव, सुरेश सातव, कैलास सातव, कुशाल सातव, मारुती गाडे, निवेदक अतुल बनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांची स्थापना, जबाबदाऱ्यांचे वाटप, नियोजनाची रूपरेषा तसेच आवश्यक सुविधा आणि व्यवस्थापन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आयोजक रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांनी नियोजनाचे प्राथमिक सादरीकरण करत स्पर्धा भव्य स्वरूपात पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला. उपस्थितांनीही आपले अभिप्राय व सूचना मांडत मार्गदर्शन केले.

“ही स्पर्धा वाघोलीकरांसाठी ऐतिहासिक ठरणार असून, वाघोलीच्या नावलौकिकात भर पडावी यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करणार आहोत,” असा विश्वास मुख्य आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी व्यक्त केला.

पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके म्हणाले, “यंदा महाराष्ट्र केसरी स्पर्धा वाघोलीत होत असल्याने या भागाला मोठी ओळख मिळणार आहे. आयोजनाची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल रामकृष्ण सातव पाटील यांचे कौतुक असून, स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कुस्तीगीर संघ आणि रामकृष्ण कर्तव्य फाउंडेशन एकत्रितपणे कार्यरत आहेत.”

महाराष्ट्राच्या समृद्ध कुस्ती परंपरेला बळ देणाऱ्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेच्या आयोजनासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली. बैठकीस विविध क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कुस्तीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इनरव्हील क्लब मावळ शक्तीचा उपक्रम

### दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांची माहिती व UDID फॉर्म भरून मदत

मावळ (दै. संध्या)



इनरव्हील क्लब मावळ शक्ती यांच्या वतीने दिव्यांग बांधवांसाठी शासकीय लाभांची माहिती देत UDID कार्डचे ऑनलाइन फॉर्म मोफत भरून देण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, टाकवे खुर्द (ता. मावळ) येथे पार पडला.

या उपक्रमात मावळ तालुक्यातील सात ते आठ गावांतील दिव्यांग बांधवांनी सहभाग घेतला. त्यांचे UDID कार्डसाठी ऑनलाइन अर्ज भरून घेण्यात आले. तसेच ज्यांची KYC प्रक्रिया अपूर्ण होती, त्यांची केवायसी मोफत करून देण्यात आली. काही लाभार्थ्यांना ऑनलाइन प्रमाणपत्र मिळाले नव्हते, त्यांच्याही अर्जाचे काम पूर्ण करण्यात आले. यावेळी घरकुल योजना, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमास मावळ पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी सेवक थोरात, इनरव्हील क्लब मावळ शक्तीच्या अध्यक्षा ज्योतीताई राजिवडे, पंचायत समिती सदस्य रेश्माताई देवकर, क्लब सेक्रेटरी सुरैया शेख, ट्रेझरर राजश्री नाईकरे, एडिटर छाया साळुंखे, ओबीसी सेल युवती अध्यक्षा पूजा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल येवले, भरत नाना राजिवडे, डॉ. चेतन पवार, अश्विनी बेंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व सरस्वती मातेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

अध्यक्षा ज्योतीताई राजिवडे यांनी दिव्यांग बांधवांच्या अडचणी सोडवण्यासाठी स्वतःचा मोबाईल क्रमांक देत आवश्यक मदत करण्याचे आश्वासन दिले. सहाय्यक गटविकास अधिकारी सेवक थोरात यांनीही दिव्यांगांसाठी आवश्यक ती मदत करण्यात येईल, असे सांगत उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टाकवे खुर्द शाळेचे मुख्याध्यापक सुभाष भानुसघरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन छाया साळुंखे यांनी केले. उपस्थित दिव्यांग बांधवांसाठी भोजनाची व्यवस्था ओबीसी सेल युवती अध्यक्षा पूजा गायकवाड यांच्या वतीने करण्यात आली.

## घटस्फोटासाठी ‘व्यभिचार’ ठरतोय मुख्य कारण

पुणे (दै. संध्या)

कौटुंबिक न्यायालयामध्ये दाखल होणाऱ्या घटस्फोटाच्या प्रकरणांत व्यभिचाराचा मुद्दा आता अधिक ठळकपणे मांडला जात आहे. स्वभाव भिन्नता, मानसिक व शारीरिक छळ, आर्थिक वाद ही पारंपरिक कारणे असतानाही, अनेक दाव्यांमध्ये पती किंवा पत्नीचे विवाहबाह्य संबंध असल्याचा स्पष्ट उल्लेख केला जात आहे. बदनामीची भीती हा या प्रकरणांतील महत्त्वाचा घटक ठरत आहे. विवाहबाह्य संबंधांचा उल्लेख न्यायालयीन नोंदीत राहू नये, कुटुंबीयांवर व मुलांवर त्याचा परिणाम होऊ नये, या कारणांमुळे अनेक जोडपी परस्पर संमतीने वाद मिटविण्याचा मार्ग स्वीकारतात. त्यामुळे या प्रकारची अनेक प्रकरणे अंतिम निकालापूर्वीच समझोत्याद्वारे निकाली निघत असल्याचे कौटुंबिक न्यायालयात प्रॅक्टीस करीत असलेल्या वकिलांचे निरीक्षण आहे. पोटगीच्या मागणीदरम्यानही व्यभिचाराचा मुद्दा पुढे आणला जातो. पोटगीची मागणी केल्यास साथीदारावर व्यभिचाराचा आरोप केला जातो. तसेच एका साथीदाराने घटस्फोटाचा दावा दाखल केल्यानंतर त्यात दुसरा साथीदार व्यभिचारी असल्याचे नमूद करून मानसिक छळाचे कारण मांडले जाते. व्यभिचार हा गुन्हा नसला तरी घटस्फोटासाठी महत्त्वाचा मुद्दा ठरत आहे; मात्र ठोस पुराव्यांवर न्यायालय अशा प्रकरणांत योग्य तो निर्णय देते. पत्नी व्यभिचारी असल्यास पोटगी नाकारली जाते, असा सरसकट नियम नाही.

सतत चालू असलेला व्यभिचार सिद्ध झाल्यास काही प्रकरणांत पोटगी नाकारली जाऊ शकते. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १४४ (४) व (५) नुसार, (फौजदारी दंड संहितेत कलम १२५(४) जर पत्नी व्यभिचारात राहत असेल तर तिला पोटगी मिळण्याचा अधिकार नाही, असे नमूद होते. व्यभिचार मानसिक क्रूरता म्हणून मान्य होऊ शकतो.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांच्या विधवा महिलांना मानाचा मुजरा

**खा. डॉ. अमोल कोल्हेंची आगळीवेगळी शिवजयंती**

जेजुरी (दै. संध्या)



शिवजयंतीनिमित्त दरवर्षी शिवनेरी किल्ल्याच्या पहिल्या पायरीवर नतमस्तक होण्याचा परिपाठ असलेले खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी यंदा आत्महत्याग्रस्त शेतकरी बांधवांच्या विधवा पत्नींना सन्मान देत आगळ्यावेगळ्या आणि विधायक पद्धतीने शिवजयंती साजरी केली. जिजाऊ, सावित्री आणि अहिल्याबाईंच्या लेकींना मानाचा मुजरा करत त्यांनी शिवजयंतीला सामाजिक संवेदनांचा स्पर्श दिला.

‘माणुसकीची चळवळ’ या संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या ‘जिवाची मुंबई’ उपक्रमांतर्गत यवतमाळ, वर्धा आणि अमरावती जिल्ह्यातील ३० आत्महत्याग्रस्त शेतकरी बांधवांच्या विधवा/एकल पत्नींनी शिवजयंतीनिमित्त ‘मी सावित्रीबाई फुले’ मालिकेच्या सेटला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली होती. ही इच्छा पूर्ण करत खा. डॉ. कोल्हे यांनी सहकलाकारांसमवेत त्यांचा सन्मान केला.

दरवर्षी शिवजयंती दिवशी शिवनेरीवर उपस्थित राहणारे डॉ. कोल्हे यंदा तेथे न दिसल्याने शिवप्रेमींमध्ये चर्चा रंगली होती. मात्र त्यांनी यंदा शिवछत्रपतींच्या आदर्शांचे पालन करत समाजातील दुःख भोगणाऱ्या महिलांना सन्मान देण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले.

यावेळी बोलताना खा. डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, “आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा आणि एकल महिला अत्यंत कठीण परिस्थितीत आयुष्याची लढाई लढत आहेत. त्यांच्या जीवनात आनंदाचे काही क्षण निर्माण करता आले, ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. शिवछत्रपतींनी दिलेल्या आदर्शांनुसार समाजातील वंचितांना बळ देणे हीच खरी शिवजयंती आहे.”

या कार्यक्रमात उपस्थित महिलांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान पाहून मन भरून आले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### प्रभावी डेटा व्यवस्थापनामुळे शासन अधिक पारदर्शक, वेगवान आणि नागरिकाभिमुख

मुंबई (दैनिक संध्या) : डिजिटल युगात डेटा हीच खरी शक्ती असून प्रभावी डेटा व्यवस्थापनामुळे शासन अधिक पारदर्शक, वेगवान आणि नागरिकाभिमुख होत असल्याचे भारत सरकारच्या संचार मंत्रालयाचे उपमहासंचालक सुमनेश जोशी यांनी सांगितले. भारतीय लोकप्रशासन संस्था महाराष्ट्र प्रादेशिक शाखेच्या वतीने मंत्रालयातील अधिकाऱ्यांसाठी परिषद सभागृहात आयोजित "डिजिटल गव्हर्नर मेड सिंपल व्हॉट एव्हरी ऑफिस मस्टनो" या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भारतीय लोकप्रशासन संस्था महाराष्ट्र प्रादेशिक शाखेचे अध्यक्ष स्वाधिन क्षत्रिय, मानद खजिनदार विकास देवधर आणि विशेष कार्य अधिकारी शशांक यशवंत बर्वे, यांची उपस्थित होते. सुमनेश जोशी म्हणाले, कागदी फाईल्सऐवजी डिजिटल वर्कफ्लो, नोंदवहींऐवजी डॅशबोर्ड आणि विलंबाऐवजी रिअल-टाइम मॉनिटरिंगकडे प्रशासनाची वाटचाल झाली आहे. डेटा संरचना, अचूक डेटा संकलन, पेपरलेस कामकाज आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) च्या वापरावर त्यांनी भर दिला. डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर (डीपीआय) ला डिजिटल महामार्गाची उपमा देत आधार आणि एमआधार ॲपद्वारे डेटा सुरक्षित ठेवण्याबाबत माहिती त्यांनी दिली. तसेच सायबर सुरक्षेसाठी 'संचार साथी' पोर्टल वापरण्याचे आवाहन केले. प्रशिक्षणार्थी आणि शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना डिजिटल गव्हर्नन्स या विषयाबाबत भविष्यात काही नवीन प्रश्न, शंका, मुद्दे उपस्थित झाल्यास फोन करून ईमेल पाठवून केव्हाही विचारू शकता असे जोशी यांनी यावेळी सांगितले.

### आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांनी अनुभवली 'गोरेगाव चित्रनगरी'

मुंबई (दैनिक संध्या) : गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरी (फिल्मसिटी) येथे यवतमाळ येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांनी भेट दिली. या महिलांना संपूर्ण चित्रनगरी फिरण्याची संधी मिळाली. या महिलांचे चित्रनगरीचे सह-व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांनी स्वागत केले. यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी येथे 'रसिकाश्रय' संस्था ही गेले 25 वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. या संस्थेच्या वतीने दरवर्षी 'जीवाची मुंबई' हा आगळा वेगळा उपक्रम राबविला जातो. यावर्षी या उपक्रमाच्या माध्यमातून पतीच्या निधनानंतर शेती आणि घराची जबाबदारी पेलणाऱ्या यवतमाळ जिल्ह्याच्या दुर्गम भागातील महिलांना मुंबईतील गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीची सफर घडवून आणण्यात आली. आजवर ज्या मालिका आणि चित्रपट केवळ दूरदर्शनच्या पडद्यावर पाहिले होते, त्याचे प्रत्यक्ष चित्रीकरण कसे चालते, भव्य सेट कसे असतात आणि कलाकार प्रत्यक्षात कसे दिसतात, याचा प्रत्यक्ष अनुभव महिलांनी या सहलीच्या माध्यमातून घेतला. यावेळी महिलांना चित्रीकरण कसे चालते, याविषयी मार्गदर्शन देखील करण्यात आहे. गोरेगाव चित्रनगरीत या महिलांचे आगमन झाले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच उत्साह आणि कुतूहल पाहायला मिळाले."आम्ही कधी स्वप्नातही विचार केला नव्हता की मुंबईला येऊन चित्रनगरी प्रत्यक्ष पाहता येईल," अशी भावूक प्रतिक्रिया यावेळी अनेक महिलांनी दिली. चित्रनगरीत दाखल झालेल्या या महिलांकरिता प्रशासनाने त्यांना चित्रीकरणाच्या पडद्यामागचे जग जवळून पाहण्यासाठी विशेष सहकार्य केले.

### छत्रपती संभाजीनगर येथे डिजिटल रथास उत्स्फूर्त प्रतिसाद

मुंबई (दैनिक संध्या) : स्वातंत्र्यानंतर देशाचे संविधान अंमलात येऊन यंदा 75 वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक पर्वानिमित्त राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे 'संविधान अमृत महोत्सव' अंतर्गत 'आपलं संविधान – आपला अभिमान' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या संविधान जनजागृती डिजिटल रथाचे उद्घाटन नुकतेच मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाचा भाग असलेला संविधान जनजागृती डिजिटल रथ छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये तसेच सार्वजनिक ठिकाणी भेट देत आहे. शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असून, नागरिकांनीही या रथास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या डिजिटल रथामध्ये भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया, संविधान सभेची भूमिका तसेच नागरिकांना प्रदान केलेले मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांची सविस्तर माहिती प्रभावी माध्यमातून सादर करण्यात आली आहे. समतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणविरोधी अधिकार, धर्मस्वातंत्र्याचा अधिकार, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार तसेच घटनात्मक उपायांचा अधिकार यांसह संविधानातील महत्त्वपूर्ण तरतुदींची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. या जनजागृती उपक्रमाद्वारे लोकशाही मूल्यांचे महत्त्व, संविधानाचे सामाजिक स्थान आणि नागरिकांची जबाबदारी याबाबत प्रभावी मार्गदर्शन केले जात आहे.

# शूर योद्धा राय लखिशा बंजारा...!

हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादुर साहीबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. गुरु तेग बहादुर यांच्याशी संबंधित अनेक घटनांचा, ऐतिहासिक पैलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न होत आहे. या लेखाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर यांच्याशी संबंधित शूर योद्धा राय लखिशा बंजारा यांचा आपण परिचय करुन घेणार आहोत.




अवि जी. चव्हाण, नांदेड, भ्रमणध्वनी 9763291774

(दै. संध्या)

राय लखिशा बंजारा हे मध्ययुगीन भारतातील शूर, दानशूर आणि लोककल्याणासाठी समर्पित असे महान योद्धे होते. त्यांच्या जन्मापासून ते कार्यापर्यंतचा प्रवास हा पराक्रम, त्याग आणि मानवतेचा आदर्श ठरतो. आपले राष्ट्रपती भवन पूर्वाश्रमीचे लखिशा बंजारा यांची ही भूमी आहे. पंजाबमधील खैरपूर तालुका-अलीपूर जिल्हा-मुजफ्फरगड येथे ४ जुलै १५८० रोजी त्यांचा जन्म झाला. सध्या हे ठिकाण पाकिस्तानमध्ये आहे.

वडील गोधु बंजारा वडतिया जाधव व्यवसायाने सिव्हील ठेकेदार होते.आजोबा ठाकूरदास बंजारा वडतिया जाधव योद्धा व कुशल व्यापारी होते. नागैया, हेमा, हरी, सितु, पांडरा, बक्षी, बाला, जवाहर ही मुले तर सितो नावाची मुलगी लखिशा बंजारा यांना होती. १७ नातू व २४ पणतू असा मोठा परिवार होता. १६०८ मध्ये गोराम पवार परिवारातील कांतोबाईसोबत विवाह झाला.

लखिशा बंजारा यांना ९९ वर्षे १० महिने एवढे आयुष्य लाभले. नवी दिल्ली येथे रायसिना, मालचा, बाराखांब आणि नरेला ही गावे त्यांनी वसविली आहेत व ८० तांड्याची मालकी होती. राजधानी दिल्लीच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली चार गावांची जमीन लखिशा बंजारा यांच्या नावाने महसूल रेकॉर्डवर होती,

मथुरा वृंदावन जयसिंगपूर येथे आजही लखिशा बंजारा यांची सात एकर महसुली जमीन असून उदासीन आश्रम यांच्या ताब्यात आहे. तेथे लेंगी व बंजारा होळी साजरी केली जाते. बुंदेलखंडमधील सागर परिसरात राय लखिशा बंजारा यांना लोकनायक म्हणून आदरार्थी ओळखले जाते. सागर तलाव लखिशा बंजारा यांच्या नावाने आजही ओळखला जातो. सागर तलावाजवळ लखिशा बंजारा यांचा पुतळा असून परिसरात ऐतिहासिक स्थळे व मंदिरे आहेत.

दानशूर लखिशा बंजारांनी लोककल्याणासाठी शेकडो तलाव बांधले, विहिरी खोदल्या, व्यापारी मार्गावर १० किलोमीटर अंतरावर तांडा, मुक्कामासाठी धर्मशाळा बांधल्या. लखिशा यांनी निर्माण केलेल्या विहिरी आजही बंजारा बावडी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्या दगडावर राय लखिशा बंजारा यांचे नाव कोरले असल्याचे आजही पहावयास मिळते.

फारसी भाषेतील शहा व भारतीय भाषेतील राय या दोन्ही शब्दांचा अर्थ राजा असा होतो. बाबा बंदासिंह बहादूर यांनी लोहगड किल्ल्याची निर्मिती केली. किल्ला निर्माण कार्यात लखिशा बंजारा यांचे खूप मोठे योगदान राहिले होते. बांधकामासाठी लागणारे कारागीर, मजूर, दगड, चुना इत्यादी साहित्य त्यांनी पुरविले. हरियाणामधील यमुनानगर जिल्हा आणि हिमाचल प्रदेशातील सिरमोर जिल्ह्यात लोहगड किल्ला ७ हजार एकर भूक्षेत्रात विस्तारला आहे. लोहगड किल्ला, लाल किल्ला, बंजारा विश्रामस्थल आणि गुरुद्वारा रकबगंज ही त्यांची ऐतिहासिक संस्मरणीय कृती याची साक्ष देत आहे. दिल्लीचा लाल किल्ला लखिशा बंजारा यांच्या २५५ एकर क्षेत्रात निर्माण केला गेला आहे. किल्ल्याला दक्षिण दिशेला लाहोर मुख्यद्वार, दुसरा मुख्यद्वार दिल्ली गेट आणि यमुना नदीकडे असलेला वॉटर गेट अशी रचना केलेली आहे.

लखिशा बंजारा हे शूरवीर व दानशूर योद्धा होते. धर्म स्वातंत्र्य आणि मानवतेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणारे शिखांचे नववे गुरू तेग बहादुर यांचे मृत शरीर मिळविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावून त्यांचा अंतिम संस्कार रायसिना रकाबगंज दिल्ली येथे केला व रक्षा एका घटात भरुन जमिनीत पुरली. गुरू तेग बहादुरसिंह यांचे शिर भाई जेता बंजारा यांनी १६ नोव्हेंबर १६७५ रोजी त्यांचे पुत्र गोविंद राय यांना सुपूर्द केले व १७ नोव्हेंबर रोजी आनंदपूर साहिब येथे अंत्यसंस्कार करण्यात आला. जगातील ही एकमेव घटना आहे की, शरीर व शिर यांचा अंत्यसंस्कार दोन वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आला. १५ जानेवारी १७८३ रोजी लखिशा बंजारा वडतिया यांच्या घराची एक भिंत बांधकामासाठी पाया खोदणे सुरू होते तेंव्हा जमिनीत पुरून ठेवलेला घट निघाला. हे स्थळ आजच्या संसद भवन समोरच आहे. आता तेथे लखिशा बंजारा यांचे स्मरणार्थ भाई लखिशा बंजारा हॉल बांधण्यात आला आहे. रायसिना टेकडीच्या बाजूला मालचा तांड्यात लखिशा बंजारा यांनी २८ मे १६८० रोजी दिल्ली मालचा पॅलेसमध्ये अखेरचा श्वास घेतला. लखिशा बंजारा हे महान सेनानी आपले प्रेरणास्थान म्हणून सदैव संस्मरणीय राहील.

हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन राज्यभर करण्यात आले. नागपूर आणि नांदेड येथे अल्पसंख्याक विकास विभाग, राज्यस्तरीय समन्वय समिती आणि शीख सिकलीगर, बंजार, लबाना, मोहयाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन व भगत नामदेव संप्रदाय समुदायाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. यावेळी लाखोंच्या संख्येने भाविक राज्य, देशभरातून आले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून युवा पिढीपर्यंत श्री गुरु तेग बहादुर यांचा शौर्याचा इतिहास पोहाचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. आता २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी खारघर, नवी मुंबई येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वाढीचे थकीत हप्ते देण्यासाठी शासन कटिबद्ध – मंत्री प्रताप सरनाईक



मुंबई (दै. संध्या)

एसटीच्या सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांचे वेतन वाढीचे थकीत हप्ते देण्यासाठी शासनाने तातडीने १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. लवकरच फेब्रुवारी महिन्याच्या वेतनासोबत देण्यात येणारा वेतन वाढीचा थकीत हप्ता कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. तसेच या अनुषंगाने येत्या २४ फेब्रुवारीला काही कामगार संघटनांनी पुकारलेले आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी कर्मचाऱ्यांना वेतन वाढीच्या थकीत हप्ता देण्यासाठी एसटी महामंडळाकडे पैसे नसल्यामुळे शासनाने ती जबाबदारी उचलावी. अशी चर्चा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तत्कालीन उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्याशी केली होती. त्यानुसार त्यांच्या अनुमतीने दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये शासनाने अनुदान स्वरूपात एसटीला देण्याचे बैठकीमध्ये ठरले होते. थकीत हप्ते डिसेंबर महिन्याच्या वेतनासोबत देण्यास सुरुवात झाली. तथापि, काही तांत्रिक अडचणींमुळे फेब्रुवारी महिन्याच्या वेतनासोबत सदर हफ्ता देण्यासाठी एसटी महामंडळाकडे निधी उपलब्ध नव्हता. त्यामुळे थकीत हप्ता न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याची भावना एसटी कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण होऊन त्यांच्यात नाराजी पसरली. अशा परिस्थितीत काही कामगार संघटनांनी आंदोलनाच्या पवित्रा घेतला होता. ही गंभीर परिस्थिती ओळखून परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दोन्ही उपमुख्यमंत्री व मुख्यमंत्री यांचीशी चर्चा करून या थकीत हप्त्यापोटी २१० कोटी रुपये तातडीने सरकारने एसटीला द्यावेत, अशी विनंती केली. यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा देखील केला. त्यामुळे त्या २१० कोटी रुपयांपैकी १०० कोटी रुपये आज शासनाने दिले असून उर्वरित निधी देखील लवकरच प्राप्त होईल. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाचे हप्ते कोणते परिस्थितीमध्ये देण्यात येतील, असे आश्वासन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शासनाच्या वतीने दिले आहे. त्याचप्रमाणे, सध्या दहावी व बारावीच्या मुलांच्या परीक्षा सुरू असल्यामुळे त्यांच्या प्रवासात कोणते अडथळा निर्माण होऊ नये यासाठी काही संघटनांनी पुकारलेले आंदोलन तातडीने स्थगित करावे, असे देखील आवाहन त्यांनी यावेळी केले आहे.

## आदिवासी आश्रमशाळांचा दर्जा उंचावणार - मंत्री डॉ. अशोक वुईके

मुंबई (दै. संध्या)

राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि स्पर्धात्मक शिक्षण मिळावे यासाठी आश्रमशाळांचा दर्जा उंचावण्यावर विशेष भर राहणार आहे. आश्रमशाळांमधील इमारतींची डागडुजी, स्वच्छता, सुरक्षितता आणि इतर मूलभूत सुविधांची उभारणी तातडीने करावी. तसेच आदिवासी विकास विभागाचा निधीचा खर्च थेट लाभार्थ्यांवर केला जाईल असे आदिवासी विकास विभागाचे मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी सांगितले.



आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमकरिता 2026-27 चे प्रारुप आराखडे तयार करण्यासाठी जिल्ह्यांची बैठक मुंबईत घेण्यात आली. या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे वन मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, आदिवासी विकास विभागाचे प्रभारी आयुक्त गोपीचंद कदम, स्थानिक लोकप्रतिनिधी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.

मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, प्रत्येक आश्रमशाळेत सुसज्ज वाचनालय आणि स्वतंत्र वाचनकक्ष असणे अनिवार्य करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक साधने, डिजिटल सुविधा आणि गुणवत्तापूर्ण वातावरण उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. राणी दुर्गावती योजना अंतर्गत आदिवासी महिला बचत गटांना प्राधान्य देण्यात येईल. महिला बचत गटांच्या माध्यमातून

### पायाभूत सुविधांवर भर, योजना व लाभार्थी केंद्रस्थानी ठेऊन निधी खर्च करावा

रोजगारनिर्मिती देणारी आदिवासी महिला उद्योजक बनली पाहिजे.

आदिवासी जिल्ह्यांमध्ये आदिवासी देवतांसाठी तीर्थक्षेत्र विकासासाठी स्वतंत्र निधी देण्याबाबतही बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली. ज्या जिल्ह्यांकडून सांस्कृतिक भवन उभारणीसाठी मागणी आहे, त्यांनी आवश्यक प्रस्ताव सादर करावेत. ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील आदिवासी वस्त्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला जात आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा निर्माण करण्यात येतील, असे मंत्री वुईके यांनी सांगितले.

प्रत्येक जिल्ह्यातील किमान एका आश्रमशाळेची निवड करून ती अत्याधुनिक सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण व आदर्श व्यवस्थापनाच्या निकषांवर आधारित 'मॉडेल आश्रमशाळा' म्हणून विकसित करण्यात यावी. तसेच आदिवासी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या 'पीएम-जनमन' योजना आणि 'धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान' या महत्त्वपूर्ण योजनांची जिल्हास्तरावर प्रभावी, आणि वेळेत अंमलबजावणी करण्यात यावी.

# इंडिया AI इम्पॅक्ट समिट २०२६ मध्ये 'कुंभदूत' एजेंटिक AI संकल्पनेचे सादरीकरण

### सिंहस्थ २०२७ पूर्वी टप्प्याटप्प्याने तंत्रज्ञानाचा उपयोग

नवी दिल्ली (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आज नवी दिल्ली येथे आयोजित 'इंडिया AI इम्पॅक्ट समिट २०२६'मध्ये 'कुंभदूत' या एजेंटिक AI आधारित संकल्पनेचे सादरीकरण करण्यात आले. नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना अधिक सोयीस्कर मार्गदर्शन व सहाय्य मिळावे या उद्देशाने ही संकल्पना सादर करण्यात आली असून, पुढील काळात या प्रणालीचा टप्प्याटप्प्याने 'कुंभदूत' तंत्रज्ञानात उपयोग करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, बंदरे विकास व मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, नाशिक विभागीय आयुक्त तसेच नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण प्रमुख डॉ. प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व तंत्रज्ञान तज्ज्ञ उपस्थित होते.

ही संकल्पना "एजेंटिक कुंभ" या मॉडेलवर आधारित आहे. सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर, सिंहस्थ २०२७ मध्ये नोंदणीकृत प्रत्येक भाविकाला एक वैयक्तिक एआय सहाय्यक मिळणार आहे. या सहाय्यकाचे नाव "कुंभदूत" असेल. हा कुंभदूत भाविकाला प्रवास, निवास, घाटांची माहिती, आपत्कालीन मदत, पेमेंट, भाषांतर आदी बाबतीत मार्गदर्शन करेल.

एजेंटिक म्हणजे असा तंत्रज्ञानाधारित प्रणालीचा वापर, ज्यामध्ये प्रत्येक व्यक्तीचा स्वतःचा डिजिटल सहाय्यक (एआय एजंट) त्याच्या वतीने काम करतो. हा सहाय्यक शासन, आरोग्य सेवा, वाहतूक व्यवस्था किंवा स्थानिक विक्रेते यांच्याशी समन्वय साधतो. मात्र, हे सर्व काम भाविकाच्या परवानगीने आणि गोपनीयता जपून केले जाते. कोणताही केंद्रीकृत डेटाबेस तयार केला जाणार नाही.




कुंभदूत एआय सहाय्यक २० पेक्षा अधिक भारतीय भाषांमध्ये कार्य करू शकणार आहे. स्मार्टफोन असो वा साधा फीचर फोन, अगदी कॉल करूनही (IVR प्रणालीद्वारे) भाविक या सेवांचा लाभ घेऊ शकतील. डिजिटल साक्षरता नसलेल्या किंवा वयोवृद्ध भाविकांनाही सोप्या आवाजाच्या माध्यमातून माहिती मिळेल.

या प्रणालीमध्ये 'कुंभ पास' ही संकल्पना देखील प्रस्तावित आहे. हा पास ऐच्छिक असेल आणि तो डिजीलॉकरमध्ये सुरक्षित स्वरूपात ठेवला जाईल. यामुळे प्रवेश प्रक्रिया, सेवा मिळविणे आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे अधिक सुलभ होईल.

ही संपूर्ण यंत्रणा भारताच्या डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरवर आधारित असेल. यूपीआयद्वारे पेमेंट, आरोग्य नोंदीसाठी, व्यापाऱ्यांसाठी, तसेच डिजीलॉकर यांचा समन्वय या प्रणालीत असेल. मात्र, भाविकांची वैयक्तिक माहिती केंद्रीकृत स्वरूपात साठवली जाणार नाही. सर्व माहिती ही मर्यादित कालावधीसाठी आणि भाविकाच्या संमतीनेच वापरली जाईल.

ही प्रणाली सिंहस्थ काळात १ कोटीपर्यंत भाविकांना आणि लाखो डिजिटल एजंट्सना हाताळण्यास सक्षम असेल. सिंहस्थ २०२७ पूर्वी नाशिकमधील महाविद्यालयांमध्ये १०,००० सहभागींसह पायलट प्रकल्प राबविण्यात येणार आहे .

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, "सिंहस्थ २०२७ हे श्रद्धा आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम ठरणार आहे. एजेंटिक कुंभ ही संकल्पना महाराष्ट्राला जबाबदार आणि नैतिक एआय वापराच्या क्षेत्रात आघाडीवर नेईल."

नाशिक विभागीय आयुक्त तथा कुंभमेळा प्राधिकरण अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम म्हणाले, "सिंहस्थ हा जगातील सर्वात मोठ्या शांततापूर्ण धार्मिक मेळाव्यांपैकी एक आहे. अशा विशाल सोहळ्याचे नियोजन करताना दूरदृष्टी आणि समन्वय आवश्यक असतो.

एजेंटिक कुंभ संकल्पनेमुळे गोपनीयता जपत एकत्रित मागणी संकेतांच्या आधारे अधिक अचूक नियोजन करता येईल. यामुळे विविध विभागांमधील समन्वय आणि सेवा वितरण अधिक प्रभावी होईल. ही प्रणाली पारदर्शक आणि समतोल स्वरूपाची असून कोणत्याही कंपनीला विशेष लाभ देणारी नाही."

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह म्हणाले, "एजेंटिक कुंभमुळे प्रत्येक भाविकाला वैयक्तिक सहाय्य मिळेल. भाषेची अडचण, माहितीचा अभाव किंवा गर्दीतील गोंधळ यामुळे भाविकांना होणारा त्रास कमी होईल. ही प्रणाली नियंत्रणासाठी नव्हे, तर समन्वयासाठी आहे."

### 'कुंभदूत' एजेंटिक AI संकल्पनेची प्रमुख वैशिष्ट्ये

- प्रत्येक नोंदणीकृत भाविकासाठी वैयक्तिक एआय सहाय्यक
- २० पेक्षा अधिक भारतीय भाषांमध्ये आवाजावर आधारित सेवा
- स्मार्टफोन, फीचर फोन (कॉल) आणि किऑस्कद्वारे उपलब्धता
- ऐच्छिक 'कुंभ पास' – डिजीलॉकरमध्ये सुरक्षित साठवण
- यूपीआयद्वारे सोपी डिजिटल पेमेंट सुविधा
- प्रवास, निवास, घाट, आरोग्य व आपत्कालीन मदत मार्गदर्शन
- शासन विभाग, आरोग्य सेवा व व्यापाऱ्यांशी डिजिटल समन्वय
- गोपनीयता जपणारी, संमतीवर आधारित प्रणाली
- सिंहस्थपूर्व १०,००० जणांसह पायलट प्रकल्प



## सकरा वर्ल्ड हॉस्पिटलने केली ‘इंटिग्रेटेड इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर केअर अँड ब्लड डिसऑर्डर्स’ची सुरुवात

पुणे (दै. संध्या)

भारतातील पहिले १००% एफडीआय-निधीत तृतीयस्तरीय आरोग्यसेवा रुग्णालय असलेल्या सकरा वर्ल्ड हॉस्पिटलने आपल्या अत्याधुनिक आणि एकात्मिक ‘इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर केअर अँड ब्लड डिसऑर्डर्स’चे उद्घाटन केले. अचूकता-आधारित, तंत्रज्ञान-सक्षम आणि रुग्ण-केंद्रित कॅन्सर व हिमॅटोलॉजी उपचार एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या विशेष केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.

नवीन संस्थेमध्ये मेडिकल ऑन्कोलॉजी, सर्जिकल ऑन्कोलॉजी, ब्रेस्ट ऑन्कोलॉजी, हिमॅटोलॉजी, अॅनेस्थेसियोलॉजी, क्रिटिकल केअर तसेच प्रगत शस्त्रक्रिया तज्ज्ञता यांसह संपूर्ण ऑन्कोलॉजी सेवा उपलब्ध असतील. आधुनिक निदान सुविधा आणि मल्टिडिसिप्लिनरी ट्यूमर बोर्ड्स यांच्या सहकार्याने या सेवा पुरवल्या जातील. या एकात्मिक मॉडेलमुळे समन्वित निर्णयप्रक्रिया आणि प्रत्येक रुग्णाच्या गरजेनुसार वैयक्तिकृत उपचार योजना निश्चित होईल. ही पुढाकार सकरा वर्ल्ड हॉस्पिटलच्या लवकर निदान, अचूक उपचार आणि सर्वांगीण काळजीद्वारे कॅन्सर उपचार परिणाम सुधारण्याच्या बांधिलकीचे प्रतीक आहे.डॉ. विनीत गुप्ता, संचालक व प्रमुख – इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर केअर अँड ब्लड डिसऑर्डर्स, सकरा वर्ल्ड हॉस्पिटल म्हणाले, “वैद्यकीय संशोधन आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आज अनेक प्रकारचे कॅन्सर लवकर ओळखल्यास प्रभावीपणे उपचार करता येतात. भारतात दरवर्षी १४ लाखांहून अधिक नवीन कॅन्सर रुग्ण नोंदवले जातात; मात्र जागरूकतेचा अभाव आणि उशिरा निदान यामुळे अनेक रुग्ण प्रगत अवस्थेत उपचारासाठी येतात. वेळेवर निदान, शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा यामुळे परिणामांमध्ये लक्षणीय बदल घडवता येतो.”

हे संस्थान अवयव-विशिष्ट ऑन्कोलॉजी, मिनिमली इन्व्हेसिव्ह व रोबोटिक शस्त्रक्रिया, केमोथेरपी, सपोर्टिव्ह व पॅलिएटिव्ह केअर तसेच दीर्घकालीन सर्व्हायव्हरशिप कार्यक्रमांवर विशेष भर देणार आहे. निदानापासून बरे होण्यापर्यंत आणि त्यानंतरही सातत्यपूर्ण सेवा सुनिश्चित केली जाईल. याशिवाय, लवकर निदानाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रतिबंधात्मक ऑन्कोलॉजी, रुग्ण शिक्षण आणि जनजागृती उपक्रम राबवले जातील.

> सकरा वर्ल्ड हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक श्री युइची नागानो म्हणाले, “इन्स्टिट्यूट ऑफ कॅन्सर केअर अँड ब्लड डिसऑर्डर्सची स्थापना सकराच्या जपानी अचूकता, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि क्लिनिकल उत्कृष्टतेच्या माध्यमातून भारतात जागतिक दर्जाची आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या ध्येयाला अधिक बळकटी देते.”

# प्राचीन इतिहासाच्या दस्तऐवजांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची गरज

**महापौर मंजुषा नागपुरे**

पुणे (दै. संध्या)

आपल्या देशाच्या जाज्वल्यपूर्ण अशा प्राचीन इतिहासाच्या दस्तऐवज, साहित्यांचे, स्मारकांचे संरक्षण आणि संवर्धन होण्याची मोठी गरज आहे, ज्यासाठी भांडारकरसारख्या संस्था वर्षानुवर्षे चिकाटीने काम करीत आहेत, अशा कार्याला सरकारबरोबरच समाजाच्या दातृत्वाची देखील गरज असल्याचे प्रतिपादन पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी आज येथे केले. यावेळी त्यांच्या हस्ते महाभारत-सांस्कृतिक सूची या संशोधन प्रकल्पातील "भीम" या पुस्तकाचे प्रकाशन देखील करण्यात आले. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेच्या संग्रहातील महत्त्वाची हस्तलिखिते, ग्रंथ आणि मौल्यवान वस्तूंचा तसेच संशोधनप्रकल्पांचा समावेश असलेल्या "ज्ञानसागर" प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी खेलरत्न पुरस्कार विजेत्या ऑलिंपिकपटू नेमबाज अंजली भागवत, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. स्मिता लेले, संस्थेचे अध्यक्ष अभय फिरोदिया, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन, मानद सचिव प्रा. सुधीर वैशंपायन, विश्वस्त प्रदीप रावत व्यासपीठावर उपस्थित होते. भांडारकर संस्थेत येत्या सोमावरपर्यंत (23 फेब्रुवारी) हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे.

पुढे बोलतांना महापौर नागपुरे म्हणाल्या की, जुन्या गोष्टींचे महत्व लक्षात घेवून या क्षेत्रात अधिकाधिक संशोधन व्हायला हवे. संशोधक तयार होण्यासाठी अशा प्रकारच्या प्रदर्शनांची गरज आहे, ज्यातून या क्षेत्राकडे तरुणांना येण्याचे प्रोत्साहन मिळेल. भांडारकर संस्थेच्या पुढील कार्यासाठी पुणे महानगरपालिका सर्वतोपरी सहाय्य करेल व राज्य व केंद्र सरकारकडे देखील पाठपुरावा करू.



भांडारकर संस्थेच्या कार्याचा गौरव करतांना अंजली भागवत म्हणाल्या की, जगातील सर्वात मोठे भांडार असलेली तिजोरी म्हणजे भांडारकर संस्था आहे. या संस्थेकडे असलेला प्राचीन साठा बहुमूल्य आहे, त्याचे सर्व समाजाला दर्शन व्हावे यासाठीचा हा ज्ञानसागर प्रदर्शनाचा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.

यावेळी फिरोदिया म्हणाले की, संशोधनाच्या क्षेत्रात गेली 108 वर्षे कार्यरत असणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेच्या कार्यात तरुणांचा सहभाग वाढला पाहिजे. भारताचा अलौकिक असा प्राचीन इतिहास सर्वांनी अभ्यासला पाहिजे, यासाठीच भांडारकर संस्था चिकाटीने कार्य करीत आहे. या प्रदर्शनाच्या निमित्ताने भांडारकर संस्थेचे कार्य सर्वसामान्यांना समजू शकेल.

संस्थेच्या नियामक परिषदेचे सदस्य व या प्रदर्शनाचे समन्वयक मनोज एरंडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर संतोष रासकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे निबंधक श्रीनन्द बापट यांनी केले.

## सुखी जीवनासाठी शिवतत्त्व आत्मसात करणे आवश्यक – डॉ. रवींद्र भोळे

पुणे (दै. संध्या)



मनुष्य आयुष्यभर भौतिक सुखाच्या मागे धावत राहतो आणि मोहमायेच्या जाळ्यात अडकून जीवनाच्या प्रारंभ, मध्य व अंत या टप्प्यांचा विचार करत नाही. जन्म, वृद्धत्व आणि मृत्यू या अटळ सत्यांमधून प्रत्येकाला जावे लागते. त्यामुळे पृथ्वीवर अस्तित्व असेपर्यंत सुखी, समाधानी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी शिवतत्त्व आणि श्रीकृष्ण तत्त्व आत्मसात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार ह.भ.प. डॉ. रवींद्र भोळे महाराज यांनी केले.

महाशिवरात्रीच्या शुभपर्वानिमित्त शांताराम गिरी महाराज यांच्या प्रेरणेने आयोजित श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळ्यात त्यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

शिवतत्त्व म्हणजे सर्वव्यापी चैतन्य, अंतर्गत शांती, संरक्षण आणि आवश्यकतेनुसार विनाशाची शक्ती, असे सांगत त्यांनी भगवद्गीतेतील प्रकृती, जीवात्मा, कालचक्र, कर्म आणि परमेश्वर या तत्त्वज्ञानाचा उलगडा करून कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, निष्काम कर्मयोग आणि मोक्षप्राप्ती यांचा मार्ग म्हणजे श्रीकृष्ण तत्त्व असल्याचे स्पष्ट केले.

पुरंदरची भूमी साधू-संतांच्या वास्तव्याने पवित्र झालेली असून येथे अनेक सुप्रसिद्ध देवस्थाने आहेत. या देवस्थानांचा जिर्णोद्धार व विकास केल्यास पर्यटनाला चालना मिळून स्थानिक अर्थकारणाला बळ मिळू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास संपत खेडेकर (माजी सरपंच), परशुराम खेडेकर (माजी उपसरपंच), बापू मार्तंड खेडेकर, उत्तम नामदेव खेडेकर, मधु खेडेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच प्रवचनकार तानाजी खेडेकर महाराज, वसलाताई मोडक महाराज, महादेव महाराज खराडे, केरूजी महाराज चव्हाण, मुक्ताबाई चव्हाण महाराज, शिवाजी भोसले महाराज यांचीही प्रवचने झाली.

यावेळी कीर्तनकार मोहिनी ताई मुळीक (बारामती), गोरख सुतार महाराज (आळंदी), संतोष महाराज गाडेकर (भिगवण), भय्यू महाराज झेंडे (दिवे), कोल्हे ताई (पुरंदर) आणि बाळकृष्ण महाराज गोगावले यांनी कीर्तन सादर केले. कार्यक्रमाचे आयोजन समस्त ग्रामस्थ गुरोळी, कैलास मठ व श्री शिवशंकर मंदिर भक्तगण यांच्या वतीने करण्यात आले होते. पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## क्रीडा पत्रकारितेवर शोककळा

### ज्येष्ठ पत्रकार विक्रांत आढाव यांचे निधन

पुणे (दै. संध्या)



क्रीडा पत्रकारितेत आपली ठळक ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ क्रीडा पत्रकार विक्रांत आढाव (वय ५२) यांचे शनिवारी (ता. २१) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने पुण्यातील पत्रकारिता क्षेत्रासह क्रीडा विश्वावर शोककळा पसरली आहे. विक्रांत आढाव यांनी दीर्घकाळ क्रीडा पत्रकार म्हणून काम करताना विविध राष्ट्रीय-राज्यस्तरीय स्पर्धांचे सखोल वार्तांकन केले. दै. ‘संध्या’मध्ये संपादक म्हणूनही ते कार्यरत होते. क्रिकेट, कुस्ती, अॅथलेटिक्ससह विविध क्रीडा प्रकारांवरील त्यांचे अभ्यासपूर्ण लिखाण आणि स्पष्ट मांडणीमुळे ते वाचकांमध्ये लोकप्रिय होते. क्रीडा क्षेत्रातील घडामोडींवर त्यांचा अचूक दृष्टिकोन आणि तरुण पत्रकारांना दिलेले मार्गदर्शन यामुळे त्यांनी पत्रकारितेत वेगळी छाप सोडली. त्यांच्या अकाली निधनाने सहकारी पत्रकार, क्रीडापटू, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमींमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. अनेकांनी सोशल मीडियाद्वारे त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. आढाव यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि बहिण असा परिवार आहे. त्यांच्यावर रविवारी (ता. २२) दुपारी १२ वाजता पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. पत्रकारिता आणि क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची कायम आठवण राहील, अशा शब्दांत विविध क्षेत्रांतून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### श्रीमंत शंभुसिंह महाराज हायस्कूल येथे विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देवून स्वागत

माळेगाव (दैनिक संध्या) : विद्यार्थ्यांनो, दहावी ची परीक्षा हि आपल्या शैक्षणिक जीवनातील महत्वाची परिक्षा असुन परिक्षेची भिती न बाळगता आणी दडपण न घेता सर्व पेपर चांगल्या प्रकारे सोडवुन उत्तम यश मिळवा असे प्रतिपादन कारखान्याचे माजी अध्यक्ष रंजन तावरे यांनी केले.माळेगाव येथील श्रीमंत शंभुसिंह महाराज हायस्कूल येथे दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले,यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी उपनिरीक्षक देविदास साळवे,विश्वास भोसले, दत्तात्रय तावरे,कल्याण पांचागणे,योगेश भोसले, अजित आत्तार, ऋषीकेश बनसोडे,विद्यार्थी व पालक उपस्थित होते.यावेळी बोलताना उपनिरीक्षक देविदास साळवे म्हणाले की,दहावीची परीक्षा ही पुढील शिक्षणाचा पाया आहे.यामुळे या परिक्षेला धैर्याने सामोरे जावे,परिक्षा काळात काही अडचणी आल्या तर पोलिसांशी संपर्क साधावा.दरम्यान श्रीमंत शंभुसिंह महाराज हायस्कूल हे बारामती तालुक्यातील आदर्शवत परिक्षा केंद्र आहे.या केंद्रावर श्रीमंत शंभुसिंह महाराज हायस्कूल,इंग्लिश मिडीयम स्कूल,नवमहाराष्ट्र विद्यालय पणदरे येथील ३५० विद्यार्थी परिक्षा देत आहेत.प्रत्येक वर्गात सिसिटिव्ही कॅमेरा बसवला आहे.हे कॉपीमुक्त केंद्र असून विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी व आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत अशी माहिती परिक्षा केंद्र प्रमुख तथा प्राचार्य दत्तात्रय माने यांनी दिली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निरंजन शिंदे तर आभार प्रकाश धुमाळ यांनी मानले. पेपर फुटु नये यासाठी परिक्षा मंडळाने विधायक उपक्रम राबवत पेपरसाठी डिजिटल पेटी तयार केली असून विशिष्ट कोड वापरून हि पेटी उघडली जाते.यामुळे पेपर फुटीचा धोका टळला आहे.या अनोख्या उपक्रमाचे स्वागत विद्यार्थ्यांसह पालकांनी केले आहे.

### हस्तलिखिते, ग्रंथ आणि मौल्यवान वस्तूंचा ज्ञानसागर खुला

पुणे (दैनिक संध्या) : हस्तलिखिते, ग्रंथ आणि मौल्यवान वस्तूंचा तसेच संशोधनप्रकल्पांचा समावेश असलेले ‘ज्ञानसागर’ हे प्रदर्शन शनिवारपासून सुरु झाले आहे. संशोधनाच्या क्षेत्रात गेली १०८ वर्षे कार्यरत असणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेची ३०० हून अधिक प्रकाशने, तसेच महाभारत, भागवत, अथर्ववेद, कोरीव लेख, वैज्ञानिक हस्तलिखिते आणि खगोलशास्त्रीय उपकरणे या प्रदर्शनात मांडण्यात आले आहेत. अनेक शाळांच्या विद्यार्थ्यांनी व पुणेकरांनी या पहिल्याच दिवशी भेट दिली. अनेक मौल्यवान वस्तूंचा ज्ञानसागर असलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवारी (ता. २१) महापौर मंजूषा नागपुरे, खेलरत्न पुरस्कार विजेत्या ऑलिंपिकपटू नेमबाज अंजली भागवत, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. स्मिता लेले, संस्थेचे अध्यक्ष अभय फिरोदिया, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन, मानद सचिव प्रा. सुधीर वैशंपायन, विश्वस्त प्रदीप रावत यांच्या उपस्थित झाले. भांडारकर संस्थेत येत्या सोमवारपर्यंत (ता.२३) सकाळी १० ते रात्री आठ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी मोफत खुले असणार आहे. देशाच्या जाज्वल्यपूर्ण अशा प्राचीन इतिहासाच्या दस्तऐवज, साहित्यांचे, स्मारकांचे संरक्षण आणि संवर्धन होण्याची मोठी गरज आहे, ज्यासाठी भांडारकरसारख्या संस्था वर्षानुवर्षे चिकाटीने काम करत आहेत.

## पुणे महापालिका प्रवेशद्वारासमोर बेमुदत आमरण उपोषण



पुणे (दै. संध्या)

पुणे महानगरपालिकेने केशवनगर मुंढवा येथे राखीव भूखंड सर्वे नंबर 6, सर्वे नंबर 9 ते 14 या जागेवर चर्मकार समाजातील गठई कामगार व समाज बांधवांना पुण्यामध्ये हक्काचा घर मिळावा यासाठी रिपब्लिकन चर्मकार महासंघाच्या वतीने पुणे महानगर पालिका प्रवेशद्वारासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात आले होते, रिपब्लिकन चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष अध्यक्ष संजूभाऊ बनसोड यांच्या नेतृत्वात शिष्ट मंडळांनी या संदर्भाचे निवेदन पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना दिली, यावेळी चर्मकारसमाजातील महिला भगिनींनी महापालिकेतील चारही प्रवेशद्वार बंद केले. यावेळी पुणे शहर आणि जिल्ह्यातील अनेक चर्मकार बांधव भगिनी मोठ्या संख्येने यामध्ये उपस्थित होते.

यावेळी संघटनेचे खजिनदार सुनील राठी, रवींद्र शिराळे, सारिका कांबळे, सुनील चराटे, रेखा मांडवे, रोहिणी उदमले, वर्षा साबळे, वंदना चरचरे, विमल मगरे, पुष्पा बनसोडे, अशोक ठवाळ, उमेश चराटे, मयूर पोटे, लखन बेदरकर, आदि यावेळी उपस्थित होते.

## जरेवाडी येथे यशोदा सामाजिक संस्थेचा दिमाखात शुभारंभ

चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील जरेवाडी येथे अनाथांसाठी यशोदा या सामाजिक संस्थेचा खेडचे आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात शुभारंभ करण्यात आला.

आ. बाबाजी काळे यावेळी म्हणाले, " ताकद प्रत्येकाच्या मनगटात होती. तलवारी प्रत्येकाच्या हातात होत्या. पण स्वराज्य निर्माण करण्याची इच्छा आणि धमक फक्त आणि फक्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मनात होती. इतिहासाच्या पानावर रयतेच्या मनावर मातीच्या कणावर आणि विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारे महाराष्ट्राचे आराध्य दैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवनेरी किल्ला फुलांनी सजला होता.



शिवाजी महाराज जन्मोत्सवाच्या दिनी शिवनेरी किल्ल्यावर सनई चौघडा वाजला. एका महान योद्धाचा जन्मदिवस नाही, तर या महाराष्ट्राच्या मातीतील महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार जुलूमशाही नष्ट करण्यासाठी जन्माला आलेला एक तेजस्वी सूर्य होता. समता, न्याय आणि लोक कल्याणाचा पाया उभारणा-या एका युग पुरुषाचा गौरव दिन होता. शिवरायांनी अठरा पगड जाती आणि बारा बलुतेदारांना एकत्र करून ज्या स्यतेच्या स्वराज्याची निर्मिती केली, तोच समतेचा विचार पुढे महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्राणपणाने जपता आणि वाढवला.

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी १९ फेब्रुवारीला रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून जगातील पहिली शिवजयंती साजरी केली. जगातील सर्वात प्रथम शिवजयंतीचे जनक महात्मा ज्योतिबा फुले, समता मुलक समाज व्यवस्थेचे पुरस्कर्ते रयतेचे जाणते राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांना माँसाहेब राजमाता जिजाऊंचे मार्गदर्शन लाभले. हीच इच्छा मनामध्ये बाळगून रुपाली राक्षे यांनी यशोदा या सामाजिक संस्थेची स्थापन केली. गरजू व निराधार यांना या सुवर्ण संधीचा फायदा होईल, अशी स्पष्ट भूमिका जिल्हा परिषदेच्या सदस्या दिप्ती भोगाडे यांनी व्यक्त केली. याप्रसंगी पोलीस पाटील रुपाली रोडे, अर्चना किर्लोस्कर, वैशाली जरे, वैशाली कांबळे, सुरेखा रावळ, सुशिला मोरे, अॅड. सुलभा कोटबागी, सरपंच अशोक जरे, उपसरपंच मयूर जगदाळे, अंकुश जरे, संतोष ढोरे, कैलास दुधाळे, अनिल राक्षे, नितीन सैद, आदी मान्यवर उपस्थित होते.

# चाकण येथील आंबेठाण चौकातील विस्तारीकरण कामाची पाहणी

**कामांसाठी १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर**

चाकण (दै. संध्या)



चाकण येथील आंबेठाण चौकात सुरू असलेल्या विस्तारीकरण कामाची पाहणी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे व गटनेते नितीन गोरे यांनी केली आहे. वाहतूक कोंडीच्या वाढत्या समस्येवर प्रभावी उपाययोजना म्हणून पुणे - नाशिक महामार्गावरील चाकण नगरपरिषद हद्दीतील महत्त्वाच्या चौकांचे विस्तारीकरण करण्यासाठी तसेच सेवांतर्गत रस्त्यांचे तातडीने डांबरीकरण करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व चाकण नगरपरिषदेचे गटनेते नितीन गोरे यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व स्व.अजित पवार तसेच एनएचएआय यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता. त्या अनुषंगाने सदर कामासाठी एकूण १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यानुसार विविध कामे प्रगती पथावर आहेत.

येथील आंबेठाण चौकात एनएचएआयचे अधिकारी दिलीप शिंदे यांच्या उपस्थितीत सुरू असलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. सध्या नाल्यामध्ये पाईप टाकून त्यावर स्लॅब टाकण्याचे काम सुरू असून, त्यामुळे रस्त्याची रुंदी वाढून वाहतुकी साठी अतिरिक्त जागा उपलब्ध होणार आहे. येथे पावसाळ्यातील पाण्याच्या प्रवाहाचा विचार करता योग्य त्या उपाययोजना सुचवल्या आहेत. कामांमधील काही त्रुटी निदर्शनास आणून देत संबंधित अधिकाऱ्यांना त्या तात्काळ दुरुस्त करण्याच्या तसेच संपूर्ण काम उच्च दर्जाचे आणि निश्चित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नगरपरिषद स्तरावर जी जी मदत लागेल त्यासाठी सहकार्याची भूमिका दर्शवली आहे.

चाकण नगरपरिषद हद्दीतील विशाल कॅपिटल ते मार्केटयार्ड कॉर्नर दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा पुणे - नाशिक महामार्गावरील साईड पट्ट्यांचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन दिलीप शिंदे यांनी दिले आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर वाहतूक कोंडी कमी होऊन नागरिकांना काहीशा प्रमाणात दिलासा मिळणार आहे. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितिन गोरे, चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा सुरेशभाऊ गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेवक अॅड. प्रकाश गोरे, महेश शेवकरी, नगरसेविका साधना गोरे, जयश्री नायकवाडी, स्वाती लेंडघर, उद्योजक शाम राक्षे, सुनील शेवकरी, योगेश गोरे, शांताराम नायकवाडी आदी मान्यवर उपस्थित होते.

> “चाकण येथील आंबेठाण चौकात विस्तारणीकरणाचे काम सुरू आहे. काम पारदर्शक आणि दर्जेदार होण्यासाठी नगरपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी कामाची पाहणी केली आहे. सदरच्या कामासाठी एकूण १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. चाकण मधील विविध विकास कामे सध्या प्रगती पथावर आहेत.” - नितीन गोरे, गटनेते, चाकण नगरपरिषद